अतारांकित प्रश्नोत्तरांची ५० वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२६**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात वाघांचे संगोपन व सुरक्षा करण्याबाबत**

**(१) २१० (२५-०४-२०२५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्या परवानगीशिवाय वाघांना पकडण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वन विभागाने पोंभूर्णा उपवनक्षेत्रात एका वाघिणीला दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी बेशुद्ध केले तर नागभीड वनपरिक्षेत्रात हल्लेखोर वाघाला दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जेरबंद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत वाघाला पकडण्यासाठी अटींचे पालन करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात वाघांचे संगोपन व सुरक्षा करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी आकस्मिक परिस्थिती उद्धवल्याने मानवी जिवितास धोका होऊ नये म्हणून टी-११६ या वाघीणीला प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे परवानगीने शेत शिवारातून जेरबंद करण्यात आले.

तसेच दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी क्षेत्रीय झुंझीमध्ये जखमी वाघाला (टी-१००) मानवी जिवितास धोका होऊ नये म्हणून तसेच उपचाराकरीता बचाव करुन टीटीसी सेंटर चंद्रपूर व रेस्क्यु सेंटर गोरेवाडा येथे स्थलांतरीत करण्यात आले.

(३) हे खरे नाही.

(४) वाघांचे सुरक्षेसाठी करण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक उपाययोजना खालीलप्रमाणे आहे:

- ज्या ठिकाणी वाघ/बिबट या वन्यप्राण्यांचा वावर आहे अशा ठिकाणी सुचना फलक लावण्यात आले आहेत.
- कॅमेरा ट्रॅपच्या सहाय्याने वास्तविक वेळ देखरेख ठेवण्यात येते.
- क्षेत्रीय अधिकारी/कर्मचारी यांचेद्वारे ग्रामसभा घेऊन जंगलात एकट्याने न जाणेच्या सुचना सभेत व दवंडीद्वारे दिली जातात.
- वाघ/बिबट च्या हालचालीचे सनियंत्रण करण्यासाठी पशुधन हानीवर देखरेख ठेवण्यात येते.
- वनसंपत्तीचे व वन्यजीवांचे संरक्षण व जतन करणे यासंबंधात जनजागृती होण्याच्या दृष्टीने वन्यप्राणी

सप्ताह, जागतिक वन दिन, व्याघ्र दिवस यासारखे कार्यक्रम साजरे करण्यात येतात.

• वन्यजीव/वाघ अधिवास क्षेत्रातील रस्त्यावर वाहने सावकाश चालविण्याबाबत फलक लावण्यात आलेले आहे.

• वाघांची शिकार होऊ नये याकरीता पारधी गावालगत पाल/तंबु टाकुण राहणारे बाहेरगावी इसम, तांडे इत्यादी तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील ससुन डॉक फिशिंग बोटीचे काम उरण-कारंजा येथे हलविण्यात आल्याबाबत

**(२) ३१० (२८-०४-२०२५). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ससुन डॉक येथे १०० वर्षापासून सुरु असलेल्या फिशिंग बोटीचे काम उरण-कारांजा येथे दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ पासून हलविण्यात आल्याने या व्यवसायावर अवलंबून असलेले कामगार बर्फ पुरवठादार, हातगाडी कामगार, महिला व ठेलेवाले अशा जवळपास १० हजार लोकांच्या उदर निर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याचे दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या बेरोजगारांच्या उदर निर्वाहाचा प्रश्न उद्धवल्याने राज्य व केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (१५-०५-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.

सदर विषयी आशयाचे दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२४ रोजीचे निवेदन प्रादेशिक उपआयुक्त मत्स्यव्यवसाय, मुंबई यांचे कार्यालयाचे अभिलेखी तपासणी अंती निदर्शनास आलेले आहे. ससुन डॉक बंदरावर माहे ऑगस्ट, २०२४ पूर्वी मासळी उतरविणाऱ्या यांत्रिक नौकांची संख्या ९८८ एवढी होती. सद्यास्थितीत मासळी न-उत्तरविणाऱ्या यांत्रिक नौकांची संख्या ७८८ एवढी आहे. म्हणजेच करंजा बंदरावर २०० नौका स्थलांतरीत झालेल्या आहेत.

ससुनडॉक बंदरात नोंदणीकृत असलेल्या बहुतांश नौका मालक हे करंजा व त्या परिसरातील रहिवाशी आहेत, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ससुनडॉक बंदरातील काही नौका सुलभ व्यावहारिक दृष्टीकोनातुन या नविन निर्माण झालेल्या करंजा बंदरात मासळी उतरवित असतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वेंगुर्ला (जि. सिंधुदुर्ग) बेटावरील भारतीय पाकोळी पक्षाच्या वसाहतीस वातावरण बदलाचा धोका निर्माण झाल्याबाबत

**(३) ७२७ (२६-०४-२०२५). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेंगुर्ला (जि.सिंधुदुर्ग) येथील रॉक्स ह्या सर्वात जुन्या खडकांचा दीप समूह असलेल्या बेटावरील भारतीय पाकोळी पक्षाच्या वसाहतीस वातावरण बदलाचा धोका निर्माण होवून पक्षाची जात नामशेष होणार असल्याचे मत शास्त्रज्ञाने व्यक्त केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी राज्यभरातील अनेक पर्यटक येत असल्याने भारतीय पाकोळी पक्षाचे संवर्धन

करण्याची मागणी पर्यटकांची व स्थानिकांकडून करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भारतीय पाकोळी पक्षांचे संवर्धन करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :** (१) भारतीय स्विफ्टलेट चे प्रजनन क्षेत्र वेंगुर्ला शहराच्या किनाऱ्यावरील बर्न्ट आयलंड आणि ओल्ड लाइटहाऊस आयलंड (वेंगुर्ला रॉक्स म्हणून ओळखले जाते) ओळखले गेले आहे. या बेटांवरील गुहा या प्रजातीसाठी प्रजननस्थळ आहेत. सद्य:स्थितीत सदर बेट महसुल विभागाच्या ताब्यात असून वनविभागाच्या मालकीमध्ये येत नाही. या अधिवासाला वातावरण बदलामुळे कोणताही धोका असल्याची माहिती वन विभागाच्या निदर्शनास आलेली नाही. परंतु, संशोधन अभ्यासांनी भारतीय स्विफ्टलेट प्रजातीच्या संवर्धनासाठी या अधिवासाचे संरक्षण आवश्यक असल्याचे निरीक्षण नोंदवले आहे.
(२) व (३) सागर किनारी भागातील सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय सागरी सुरक्षा समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमार्फत पोलीस, कोस्ट गार्ड, महसूल, बंदर विभाग, वनविभाग इत्यादी यांचे क्षेत्रीय कर्मचारी यांचे उपस्थितीत संवेदनशील क्षेत्रात दर महिन्याला संयुक्त गस्त घालण्यात येते. या गस्ती दरम्यान भारतीय पाकोळी पक्षी अधिवास क्षेत्र असलेल्या वेंगुर्ला रॉक्स या ठिकाणची पाहणी वेळोवेळी करण्यात येते व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक सूचना सर्व विभागांना मासिक बैठकी दरम्यान देण्यात येतात. तसेच स्थानिक नागरिक व बोटचालक यांना  भारतीय पाकोळी पक्षी यांचे अधिवास क्षेत्र संरक्षण व संवर्धन करणेसाठी जागृत करत आहे. त्यांच्या घरट्यांची शिकारी पूर्णपणे थांबवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मागील काही काळात अशा कोणत्याही शिकारीच्या घटना आढळून आलेल्या नाहीत.

जनजागृती करिता स्थानिक नागरिक, बोट चालक आणि इतर विभाग प्रतिनिधी याकरिता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय यांचेमार्फत SACON, Coimbatore यांची शास्त्रज्ञ या ठिकाणी "Population Status, Ecology and Conservation of the Indian Swiftlet in the Western Ghats, West Coast and Offshore Islands of Maharashtra." हा संशोधन प्रकल्प राबविला आहे. या प्रकल्पाचा उद्देश या प्रजातीची लोकसंख्या स्थिती आणि पर्यावरणशास्त्राचा अभ्यास करून त्याच्या दीर्घकालीन संवर्धनासाठी एक कृती आराखडा तयार करणे आहे. हा अभ्यास महाराष्ट्र वन विभागाच्या सहकर्याने करण्यात आला असून, अहवाल भारत सरकार यांना सादर करण्यात आला आहे. या अभ्यासात शिफारस केलेल्या संवर्धन उपाययोजना भविष्यात राबविण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमापूर (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकरी, कर्जदार व ग्राहकांची प्रलंबित सन २०१६ च्या खरीप हंगामातील पिक विमा नुकसान भरपाई अदा करण्याबाबत

**(४) १६२७ (२५-०४-२०२५). श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमापूर (ता.गेवराई, जि.बीड) येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखने पिक कर्ज मंजुर केल्यानंतर कर्जदारांना विमा काढून अनावश्यक आग्रह वस्तु बँक मॅनेजर व क्षेत्रीय अधिकारी यांचेकडून विक्री करण्यासाठी कर्जदारांची बँक खाती होल्ड केल्याप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन सात दिवसात अहवाल सादर करण्याचे आदेश

जिल्हाधिकारी बीड यांनी दिनांक २६ जुलै, २०२४ रोजीच्या पत्राद्वारे प्रादेशिक व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया, बीड यांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खरीप हंगामातील सन २०१६ साठी महसूल मंडळातील १५६२ शेतकऱ्यांनी पिक विम्यासाठी भरलेला विमा हप्ता रु.४९.२२ लक्ष स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा उमापूर येथे जमा केल्यानंतर बँक कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे हे शेतकरी विमा संरक्षणापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वंचित शेतकऱ्यांना ७% व्याजदराने पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयातील जनहितार्थ याचिका क्र.७३/२०१८ नुसार देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० जुलै, २०२४ रोजी वा त्यादरम्यान बँकेला लेखी पत्र देऊन पिक विमा नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित खरीप हंगामातील सन २०१६ च्या पिक विमा नुकसान भरपाई वाटपाच्या संदर्भात स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा उमापूर येथील कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (२४-०६-२०२६) :** (१), (२), (३) व (४) होय,
(५) व (६) बीड जिल्हयातील उमापूर महसूल मंडळातील शेतकऱ्यांना खरीप २०१६ च्या हंगामात देय असलेली विमा नुकसान भरपाई अदा करण्याबाबत श्री. अमरसिंह पंडीत, मा. विधानसभा सदस्य यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र.७३/२०१८ दाखल केली होती. सदर जनहित याचिकेच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दिनांक २४ सप्टेंबर, २०१९ च्या आदेशाद्वारे उमापूर महसूल मंडळातील १५६२ शेतकऱ्यांना देय असलेली नुकसान भरपाई ७ % या व्याजदराने अदा करण्याचे निर्देश स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा उमापूर यांना दिले होते.

सदर आदेशाविरोधात स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा उमापूर यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे पुनर्विलोकन याचिका क्र.९८४३/२०१९ दाखल केली असून, प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

---

## गुजरात राज्यातील जेरबंद बिबटे बार्जव्दारे नंदूरबार जिल्हयात सोडण्यात येत असल्याबाबत

**(५) १७०० (२६-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्ह्याच्या हद्दीत गुजरात राज्यातील जेरबंद बिबटे बार्जव्दारे सोडण्याचा प्रयत्न गुजरात वन विभागाचे अधिकारी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिमलखेडी व मणिबेली (ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार) परिसरातील ग्रामस्थांनी विरोध केला असता गुजरात वन विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुजरात वन विभागाचे अधिकारी जेरबंद बिबटे नंदुरबार जिल्ह्याच्या हद्दीत सोडताना नंदुरबार जिल्ह्याचे वन अधिकाऱ्यांनी अशा प्रकारांना आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा कोणती उपाययोजना करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :**(१) व (२) हे खरे नाही.

दिनांक १७ जानेवारी, २०२५ रोजी मणिबेली ता. अक्कलकुवा जि. नंदूरबार येथे वनक्षेत्र गोरा केवडीया वनविभाग, गुजरात राज्य वनकर्मचारी हे नर्मदा विकास विभाग यांच्या बार्जने जेरबंद बिबट घेऊन सायंकाळी थांबले असता घटनास्थळावर उपस्थित असलेल्या स्थानिक गांवकऱ्यांनी विरोध केल्याने सदर जेरबंद बिबट माथेसर गुजरात राज्य येथील नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आल्याचे सदर वनअधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

याबाबत मोक्यावर उपस्थित गांवकरी यांचे जबाब वनपरिक्षेत्र अधिकारी वडफळी प्रा. यांनी दिनांक १९ जानेवारी, २०२५ रोजी नोंदविले असून त्यात जेरबंद बिबट परत घेऊन गेले असल्याचे नमुद केले आहे.

(३) मानव-वन्यजीव संघर्ष रोखणेबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

- वनविभागातील क्षेत्रीय कर्मचारी सीमावर्ती क्षेत्रात दिवसरात्र नियमितपणे गस्त घालत असतात.
- ग्रामस्थांना याबाबत जनजागृती केली असून त्यानंतर असे निदर्शनास आले नाही.
- वन्यप्राण्यांचा वावर असणाऱ्या ठिकाणी कॅमेरा ट्रॅप द्वारे लक्ष ठेवणे.
- वन्यप्राणी मानवीवस्तीत येऊ नये यासाठी जंगलामध्ये पानवठे निर्माण केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराच्या उभारणीचा पहिला टप्पा शासनाने मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविल्याबाबत

**(६) १७४४ (२८-०४-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशिया खंडातील सर्वात मोठ्या वाढवण (जि.पालघर) बंदराच्या उभारणीचा पहिला टप्पा शासनाने मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास केंद्र शासनाकडून मंजूरी मिळाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (१०-०६-२०२६) :** (१) पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदराच्या उभारणीकरीता जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण यांनी केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी प्रस्ताव सादर केला होता.

(२) होय.

वाढवण येथे मोठे बंदर (Major Port) उभारण्याच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रीमंडळाने दिनांक १९ जून, २०२४ रोजी मंजुरी दिली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कपिलधारवाडी (ता.बीड) येथे भुस्खलनाचा धोका असल्याने तेथील गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(७) १८९९ (२८-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कपिलधारवाडी (ता.बीड) या मौजे पाली ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या गावाची लोकसंख्या पाचशे ते सहाशे असून येथे भुस्खलनाचा धोका असल्याने या गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतीनिधीसह गावकऱ्यांनी केली असून ती अनेक वर्षापासुन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील नदीच्या कडेला संरक्षण भिंत बांधावी व तेथे असलेल्या डोंगरी भागात संरक्षण

भिंत व लोखंडी जाळी टाकण्यात यावी तसेच तांत्रिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या बाबी तेथे राबविण्यात याव्यात अशी उक्त गावातील नागरीकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त गावातील नागरिकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीकोनातून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (०८-०७-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे. माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये मौजे कपिलधारवाडी, ता. जि. बीड येथील वस्तीतील गायरान जमिनीवरील घरे व मुख्य रस्त्यावर भूस्खलन होऊन भेगा पडल्यामुळे ग्रामस्थांना तात्पुरते स्थलांतरीत करण्यात आले. संचालक, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भारतीय भूगर्भ सर्व्हेक्षण विभाग, पुणे यांनी दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२५ रोजी मौजे कपिलधारवाडी, ता. बीड या भूस्खलनग्रस्त भागामध्ये सर्व्हेक्षण करून प्रभावित नागरिकांचे पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचे निरीक्षण नोंदविलेले आहे. त्यानुषंगाने या गावाचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यासंदर्भात दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) मौजे कपिलधारवाडी ता. बीड येथील आपत्तीचे सौम्यीकरण करण्याच्या दृष्टीकोनातुन केंद्राने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानूसार आपत्ती सौम्यीकरण अंतर्गत विविध प्रस्ताव जिल्हाधिकारी, बीड यांनी सादर केले असून निकष व निधीची उपलब्धता यांच्या अधीन राहून सदर कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कैकाडी समाजावर असलेले क्षेत्रिय बंधन उठविण्याबाबत

**(८) १९८१ (२५-०४-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील कैकाडी समाजाचा समावेश अनुसूचित जातीमध्ये असून पश्चिम महाराष्ट्रामध्ये या समाजाला विमुक्त जाती व भटक्या जमाती या वर्गामध्ये गणले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कैकाडी समाजावर असलेले क्षेत्रिय बंधन उठविण्याबाबतची मागणी अखिल भारतीय कैकाडी महासंघ महाराष्ट्र राज्य, जि.सांगली तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे माहे जानेवारी, २०२५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, वसंतराव नाईक महामंडळाच्या वतीने कैकाडी समाजातील सुशिक्षित बेरोजगार नव युवकांना कर्ज पुरवठा करणे, उक्त समाजातील नागरिकांना शेत जमीन व घरकुलासाठी जागा उपलब्ध करुन देणे, विद्यार्थ्यांची नॉन क्रिमिलेअरची अट रद्द करणे इ. प्रमुख मागण्यांची पूर्तता करण्याबाबत शासनाकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (२४-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

तथापि, सदर मागणी संदर्भात कैकाडी समाज, महाराष्ट्र राज्य, जि. पुणे यांचे दिनांक २० सप्टेंबर, २०२५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे वडगांव, शिदोडी (ता.श्रीगोंदे , जि.अहिल्यानगर) या प्रकल्पबाधित गावात शासकीय सोयी-सुविधा पुरविण्याबाबत**

**(९) २३४३ (२५-०४-२०२५). श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोणताही प्रकल्प उभारताना त्या प्रकल्पामुळे विस्थापित होणाऱ्या गावाला गावठाण दिले जाते व बाधित होणाऱ्या नागरीकांसाठी तेथे सोयी सुविधा पुरविण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे वडगांव, शिदोडी (ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) येथील घोड धरण बांधकाम करताना सन १९५७ मध्ये गावकऱ्यांच्या जमिनी गेल्यामुळे या प्रकल्पबाधित गावठणाचे पुनर्वसन करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गावात अद्याप मुलभूत सोयी-सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने उक्त गावांचे पुनर्वसन करण्यासाठी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१३ रोजी तत्कालीन मदत व पुनर्वसन मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी बैठक लावली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उपरोक्त गावाच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (१०-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी तत्कालीन मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक०८ ऑक्टोबर, २०१३ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.
(४) शासन निर्णय, क्र. पुनर्व-२०२५/प्र.क्र.०७/र-८, दिनांक ०७ एप्रिल, २०२५ अन्वये सन १९७६ पुर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पामुळे पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरविण्याकरिता प्रलंबित कामांचा कृति कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. सदर कृति कार्यक्रमामध्ये घोड प्रकल्पामुळे पुनर्वसित झालेल्या वडगाव शिंदोडी गावाचा नागरी सुविधा पुरविण्यासाठी समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुसार सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके बनविण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील मत्स्य उत्पादनामध्ये मोठया प्रमाणात घट होत असल्याबाबत**

**(१०) २५२८ (२६-०४-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २०२३-२४ मध्ये ४ लाख ६४ हजार २८८ मत्स्य उत्पादन झाले असून मागील पाच वर्षाच्या तुलनेत सर्वात कमी मत्स्य उत्पादन झाल्याचे दिनांक ७ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले

आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हवामानातील बदल, समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप आणि वाढत्या जलप्रदूषणामुळे सागरी क्षेत्रात दिवसेंदिवस मत्स्य उत्पादनावर मोठया प्रमाणावर घट होत असून त्यावर उपजिविका करणाऱ्या लाखो मच्छीमारांवर देखील उपासमारीची वेळ आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
३) असल्यास, परराज्यातील यांत्रिक तसेच यंत्रचलित मासेमारी नौकांवर प्रतिबंध घालणे व अवैध पर्ससीन तसेच एलईडी मासेमारीवरील बंदीबाबतची अंमलबजावणी होत नसल्याने राज्याच्या सागरी हद्दीत परराज्यातील मच्छीमारांनी घुसखोरी केल्याने पारंपारिक मच्छीमारांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील मत्स्य व्यवसाय वाढविण्यासाठी मत्स्य व्यावसायिकांना अद्ययावत यंत्रसामुग्री आणि सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नितेश राणे (११-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

राज्यात सन २०२३-२४ मध्ये मत्स्योत्पादन ४३४५७४ मे.टन मत्स्य उत्पादन झाले आहे. मागील पाच वर्षाचा मत्स्योत्पादनाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | सागरी मत्स्योत्पादन (टनात) |
|---|---|
| २०१८-१९ | ४६७२३२ |
| २०१९-२० | ४४३५९३ |
| २०२०-२१ | ३९८५११ |
| २०२१-२२ | ४३२७४८ |
| २०२२-२३ | ४४६२५६ |

(२) मागील काही वर्षांपासून हवामान, क्यार, महा तौक्ते यासारखी चक्रीवादळे तसेच समुद्रातील वाढता मानवी हस्तक्षेप आणि वाढते जल प्रदुषण, इ.बाबींमुळे मत्स्योत्पादन कमी जास्त प्रमाणात होत आहे.
(३) महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन (सुधारणा) अधिनियम, २०२१ अंतर्गत राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रात अनधिकृतपणे मासेमारी करणाऱ्या मासेमारी नौकांवर परवाना अधिकारी तथा अंमजबजावणी अधिकारी यांचेकडून कारवाई करण्यात येते. तसेच ड्रोन आधारीत देखरेख आणि डिजिटल डेटा मेटेनन्स यंत्र प्रणाली सद्यस्थितीत राज्यात यशस्वीरित्या राबविण्यात येत असून, ज्याआधारे अनधिकृतपणे मासेमारी करणाऱ्या नौकांवर कार्यवाही करणे शक्य होत आहे.
(४) प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत National Rolled Out Plan यांत्रिक/यंत्रचलित मासेमारी नौकांवर ट्रान्सपॉडर बसविल्यामुळे आपत्कालीन स्थितीत नौकेचा संदेश संबधित सुरक्षा यंत्रणेस तात्काळ नौकेच्या रेखांक्ष व अक्षांश सह उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. याच बरोबर या उपकरणामुळे Potential Fishing Zone बाबतची माहिती सुध्दा उपलब्ध होणार असल्यामुळे नौका मालकांस मासे असलेल्या ठिकाणी सहज पोहचुन मासेमारी करणे सोईचे होणार आहे. जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत मासळी उतरविण्याच्या केंद्रांवर पायाभूत सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वन विभाग (पुणे प्रा.) (वन्यजीव), सामाजिक वनीकरण विभागाकडून झालेल्या कामांमध्ये अनियमितता आढळून आल्याबाबत

**(११) २५४९ (२६-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वन विभाग (पुणे प्रा.) (वन्यजीव), सामाजिक वनीकरण विभागाकडून झालेल्या कामांमध्ये अनियमितता आढळून आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकवासला क्षेत्रातील वनरोपण, वनसंरक्षण, वने व्यवस्थापन, मृद व जलसंधारण आणि वनसंवर्धनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करताना वन विभागाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, वनरोपण व संरक्षण दर्जा कमी असलेल्या वनांमध्ये पुनर्रोपण करण्यासाठी कोणत्या योजना राबविण्यात आल्या व त्या यशस्वी करण्यासाठी कोणते धोरण अवलंबिले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्राम परिसरात विकास व आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत वनसंरक्षणाशी संबंधित कामे पूर्ण झाली व त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांना त्याचा फायदा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संयुक्त वन व्यवस्थापनाच्या माध्यमातून स्थानिक समुदायांचा वनसंवर्धनात सहभाग घेऊन त्याचा परिणाम वनसंवर्धनावर होत आहे तसेच वन क्षेत्रातील मृद व जलसंधारणासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, वन क्षेत्रातील मार्ग, पूल, आणि इमारतींसाठी किती निधी मंजूर करण्यात आला असून या पायाभूत सुविधांच्या देखभालीसाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२४-०६-२०२६) :** (१) हे खरे नाही.

(२) खडकवासला वनक्षेत्रात मोठ्या प्रमाणात चेकडॅम तयार करणे, गॅबीयन बंधारे बांधणे, चेनलिंक करणे, वॉच टॉवर उभारणे, वॉटर हॉल तयार करणे इ. कामे करण्यात आली असून वनसंरक्षणार्थ रोजंदारी मजूर, सुरक्षा रक्षक तसेच वनकर्मचारी यांचे मार्फत वनक्षेत्रात गस्त घालणे, जाळरेषा घेणे, रोपवनाचे संरक्षण व देखभालीची कामे करण्यात येत आहेत.

(३) भांबुर्डा वनपरिक्षेत्रात एकूण ६५ हेक्टर वनक्षेत्रात रोपवन कामे करण्यात आलेली असून, अंतर्गत घेण्यात आलेल्या रोपवनामध्ये मरअळी झालेल्या ठिकाणी नव्याने रापे लागवड करण्यात येत आहे. तसेच सदर रोपवनांमध्ये जास्तीत जास्त घनदाटता वाढावी याकरिता बांबू प्रजातीच्या रोपांची लागवड करण्यात आलेली आहे.

(४) ग्राम परिसरात विकास व आदिवासी विकास कार्यक्रमांतर्गत वनसंरक्षणाशी संबंधित कामे पुर्ण झाल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांना रोजगार उपलब्ध होत आहे.

(५) भांबूर्डा वनपरिक्षेत्राअंतर्गत संयुक्त वनव्यवस्थापन समिती अंतर्गत स्थानीक नागरिकांना मौजे सिंहगड किल्ला येथे सुरक्षारक्षक म्हणून नेमण्यात आलेले आहे. तसेच रोपवन कामांचे देखभाल व संरक्षण करणे कामासाठी रोजंदारी मजूर नेमण्यात येवून रोजगार निर्मिती झालेली आहे.

तसेच वनक्षेत्रातील मृद व जलसंधारणासाठी आवश्यक ते कृषी विभाग व जल व मृद संधारण विभाग यांचेकडील मार्गदर्शक तत्वानुसारच कामे करण्यात येत आहेत. ग्राम परिस्थितीकीय विकास समिती मार्फत स्थानिक समुदयांचा वनसंर्वधनात सहभाग होऊन त्यामुळे वनसंवर्धनाच्या विकासात भर पडते.

(६) पुणे (प्रा.) विभाग- भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील अधिकारी/ कर्मचारी यांचेकरीता शासकीय निवासस्थान बांधणे

करिता सन २०२३-२४ मध्ये रुपये १०४.१६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधी मधून वनपाल व वनरक्षक यांचेकरीता प्रकार-१ ची ३ निवासस्थाने व प्रकार-२ चे १ निवासस्थान अशी एकूण ४ शासकीय निवासस्थाने बांधण्यात आली आहेत.

तसेच भांबूर्डा वनक्षेत्रातील वहिवाट असलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे. (प्रा) पुणे (वन्यजीव) विभाग - वनक्षेत्रातील मार्ग, पूल आणि इमारतीसाठी मागील ३ वर्षात मंजूर निधी खालीलप्रमाणे : -

| अ.क्र. | योजना व लेखाशिर्ष | वर्ष | प्राप्त निधी लक्ष | झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा वार्षिक योजना वनातील मार्ग व पुल - ४४०६११२२ | २०२३-२४ | १५३.४४ | १५३.४४ |
| | | २०२४-२५ | ०.०० | ०.०० |
| | | २०२५-२६ | २९६.३० | २९६.३० |
| | एकूण | | ४४९.७४ | ४४९.७४ |

सद्य:स्थितीत सन २०२५-२६ मध्ये या विभागांतर्गत वनक्षेत्रातील मार्ग व योजनेंतर्गत २९६.३० लक्ष इतका निधी १२ कामांकरीता प्राप्त झालेला आहे.

पुणे (सा.व.) विभाग - सन २०२०-२१ ते २०२४-२५ या ५ वर्षामध्ये सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचेमार्फत एकूण ८६९ हेक्टर व २६१ कि.मी क्षेत्रावर एकूण १०,५४,४६९ रोपांची लागवड करण्यात आलेली आहे. सदर कामे गट व रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड, टेकडयांचे हरीतीकरण, पंचायतन वन, बेल वन, अमृतवन यांसारख्या योजनाअंतर्गत करण्यात आले.

तसेच, सन २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षामध्ये विविध योजनांमध्ये ३०.३२ लक्ष रोपांची निर्मिती सामाजिक वनीकरण विभाग, पुणे यांचेमार्फत करण्यात आलेली आहे.

सन २०२४-२५ मध्ये वडगाव वन परिक्षेत्रातील प्रकार २ चे निवासस्थान मध्ये वनपरिक्षेत्र कार्यालय कार्यरत असून रु.७.५९ लक्ष मधून सदरच्या निवासस्थानाची दुरुस्ती व नुतनीकरणाचे काम करण्यात आले आहे. तसेच आंबेगाव वन परिक्षेत्रातील प्रकार २ चे निवासस्थानामध्ये परिक्षेत्र कार्यालय कार्यरत असून रु.३.५० लक्ष मधून सदरच्या निवासस्थानाची दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पेण (जि.रायगड) येथील खारेपाट विभागातील एस.ई.झेड प्रकल्प चालू न झाल्याबाबत

**(१२) २७६१ (२६-०४-२०२५). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) येथील खारेपाट विभागातील महसूली गावातील मे.मुंबई एस.ई.झेड लि. या कंपनीने प्रकल्पाकरीता संपादित व शेतजमिनी खरेदीखताने नावे केलेल्या शेतजमिनी प्रकल्प अनेक वर्षांपासून सुरू न झाल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना परत देण्याबाबत दिनांक १ जून, २०१६ व दिनांक १७ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यादरम्यान तत्कालीन महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच दिनांक १२ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतजमिनी शेतकऱ्यांच्याच ताब्यात असून ७/१२ मात्र कंपनीच्या नावे असून शेतकरी कुटूंबाचे उदर निर्वाह करण्याचे अन्य साधन नसल्याने शेती करून उपजिविका चालवित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मे.मुंबई एस.ई.झेड लि.प्रकल्प सुरु न झाल्यामुळे जमीनींचे हस्तांतरण भूसंपादन अधिनियम १८९४ चे कलम ११ क व ४१ अन्वये रद्द करून उक्त कंपनीच्या नावाची कब्जेदार म्हणून झालेली नोंद रद्द करून शेतकऱ्यांच्या नावे ही जमीन पूर्ववत करून देण्याबाबत शासनाकडून अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०४-२०२६) :** (१), (२), (३) व (४) रायगड जिल्ह्यातील महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) प्रकल्पासाठी रिलायन्स कंपनीने घेतलेल्या जमिनी वापरात नसल्यास त्या शेतकऱ्यांना परत करण्यात याव्यात याबाबत मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०२ एप्रिल, २०२५ रोजी बैठक पार पडली.

सदर बैठकीतील निर्देशानुसार भूसंपादन अधिनियम १८९४ च्या अनुषंगाने भास्करन पिल्लाई वि. केरळ शासन मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०५ मे, १९९७ रोजी दिलेले आदेश व त्यानुषंगाने दिनांक १२ मार्च, २००४ रोजी निर्गमित केलेले शासन निर्णय विचारात घेऊन संबधित भूसंपादन संस्था यांनी उचित कार्यवाही करणे अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जातीत समावेश असणाऱ्या कतिया समाजाच्या व्यक्तींना जात प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत

**(१३) २८१० (२८-०४-२०२५). श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कतिया समाजाच्या अनुसुचित जातीत समावेश असणाऱ्या व्यक्तींना जात प्रमाणपत्र ऑनलाईन प्रणालीद्वारे निर्गमित करणे बंद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समाजाच्या व्यक्तीना जात प्रमाणपत्र देणे बंद केले असून कतिया समाजातील व्यक्तींना उपविभागीय अधिकारी यांनी जात प्रमाणपत्र निर्गमित केले नसून या समाजाचे विद्यार्थी शासकीय सुविधांपासून वंचीत राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उक्त समाज हा प्रामुख्याने मध्यप्रदेश, राजस्थान व छत्तीसगढ येथील असून रोजगाराकरीता महाराष्ट्रात मागील ५० ते ६० वर्षापासून वास्तव्यास असून त्यांची कोतवाल बुक नक्कल ही राज्यात ग्राह्य धरण्यात येत नसल्याने राज्यातील संपूर्ण कतिया समाज आरक्षणापासून वंचित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त समाजाला ऑनलाईन प्रणालीद्वारे जात प्रमाणपत्र काढण्यास सेतू केंद्रात संगणक प्रणालीवर कतिया - २९ ही जात नोंद होत नसल्याने जात प्रमाणपत्र निघण्यास अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कतिया समाजाच्या व्यक्तींना तात्काळ जात प्रमाणपत्र मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (२४-०२-२०२६) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

राज्यात मागासवर्गीयांना जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करण्याच्या अनुषंगाने "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातींचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३) व सदर अधिनियमांतर्गत अधिसूचित नियम २०१२ मध्ये नमूद कार्यपद्धतीनुसार जात प्रमाणपत्राकरीता आवश्यक असलेल्या दस्तऐवजांच्या प्रती अर्जदाराने सादर केल्यावर सक्षम प्राधिकारी यांचेकडून जात प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

ऑनलाईन प्रणालीद्वारे जात प्रमाणपत्र काढण्याकरीता सेतू केंद्रात संगणक प्रणालीवर कतिया - २९ ही जात समाविष्ट आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे विसरवाडी (ता. नवापूर जि.नंदुरबार ) येथील गट नं. ८०, ८०/३ मध्ये राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्र संपादीत केल्याबाबत**

**(१४) २८९९ (२९-०४-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विसरवाडी (ता. नवापूर जि.नंदुरबार) येथील गट नं. ८० मधील उपविभाग ८०/३ मधील क्षेत्र राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रोजेक्ट डायरेक्टर, नॅशनल हायवे, कार्यालय, धुळे यांचे काँट्रॅक्टर श्री. जे. एम. म्हात्रे कंपनी व या कार्यालयाचे अभियंता यांनी श्री. बाबू रेवल्या गावित, श्री. जेरमा रेवल्या गावित, श्री. करमा रेवल्या गावित व श्री. दांवजी रेवल्या गावित यांच्या गटामध्ये येऊन संपादित क्षेत्रापेक्षा जास्त क्षेत्राचा ताबा घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका सादर केली असून त्यावर सुनावणी झाल्यानंतर सदर गटाची मोजणी करण्याबाबत आदेश केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार उपअधिक्षक, भूमीअभिलेख, नवापूर यांच्या अहवालावर सक्षम प्राधिकारी, भूसंपादन विभाग तथा उपविभागीय अधिकारी, नंदुरबार यांनी अद्याप उचित कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-०६-२०२६) :** (१) व (२) राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ चौपदरीकरण व विस्तारीकरण या प्रकल्पासाठी मौजे विसरवाडी (ता. नवापूर, जि. नंदुरबार) येथील गट नं.८० मधून एकूण ९८०० चौ.मी क्षेत्र संपादित होत असून ४४३० चौ.मी. क्षेत्राचा निवाडा पारित करण्यात आला असून संबंधितांना मोबदला रक्कम अदा केलेली आहे.

उर्वरित अतिरिक्त क्षेत्र ५३७० चौ.मी. क्षेत्राचा ताबा प्रोजेक्ट डायरेक्टर, नॅशनल हायवे कार्यालय, धुळे यांचेकडील काँट्रॅक्टर श्री.जे.एम.म्हात्रे कंपनी मार्फत घेतलेला असल्याचे दिसून येते.

(३), (४), (५) व (६) याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई, खं डपीठ औरंगाबाद यांचेकडे दाखल याचिका क्र. ३६४६/२०२३ मधील सिव्हील अर्ज क्र.५३४९/२०२३ मध्ये दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजीच्या आदेशान्वये उप अधिक्षक, भूमी अभिलेख, नवापूर यांनी दिनांक२७.०९.२०२४ रोजी मौजे विसरवाडी (ता. नवापूर, जि. नंदुरबार) येथील गट नं. ८० मधील पोटहिस्सातील भूसंपादन क्षेत्राचा मोजणी अहवाल सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी फेरमोजणी करुन सविस्तर चौकशी होणेकामी जिल्हाधिकारी, नंदुरबार यांच्या आदेशान्वये त्रिस्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. तसेच प्रकल्प संचालक, भा.रा.रा.प्रा., पी.आय.यु, धुळे यांना अतिरिक्त ५३७० चौ.मी. क्षेत्राचा भूसंपादन प्रस्ताव सादर करण्याचे कळविले असून भूसंपादनाची कार्यवाही नियोजित आहे.

---

## करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजनी धरणग्रस्त गावाच्या समस्या सोडविण्यासाठी धरण प्रकल्पग्रस्त लाभविकास प्राधिकरण स्थापन करण्याबाबत

**(१५) ४३६१ (२५-०४-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) तालुक्यातील उजनी धरणासाठी सन १९८० साली पूर्ण झालेल्या यशवंत सागर जलाशयातील २९ गावे व अनेक वाड्यांचे पुनर्वसन केले असून सदर धरणग्रस्त गावांच्या मुलभूत समस्या प्रलंबित असल्याने त्या सोडविण्यासाठी धरण प्रकल्पग्रस्त लाभ विकास प्राधिकरण स्थापन करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिलेली कोणतीही आश्वासने आत्तापर्यंत पूर्ण झाली नसल्याने धरणग्रस्तांमध्ये नाराजी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त धरणाच्या पाण्यावर अनेक सहकारी व खाजगी साखर कारखाने व अनेक पंचतारांकित औद्योगिक वसाहतींना पाणीपुरवठा करण्यात येत असून शासनाला मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असतानाही धरणग्रस्त गावातील नागरिकांना मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त धरणग्रस्तांच्या मागणीवर शासनाने धरण प्रकल्पग्रस्त लाभविकास प्राधिकरण स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (२४-०६-२०२६) :** (१), (२) व (३) महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ व १९९९ मधील तरतुदींनुसार पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी पुनर्वसित गावठाणे निर्माण करण्यात आलेली आहेत. पुनर्वसित गावठाण्यांमध्ये महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ च्या कलम १०(३) नुसार नमूद १८ नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. शासनामार्फत अधिनियमातील तरतुदीनुसार पात्र प्रकल्पग्रस्त कुटुंबांना पुनर्वसन विषयक देय लाभ उपलब्ध करून देण्यात येतात.

उजनी प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात अधिनियम व प्रचलित शासन निर्णयांनुसार पुनर्वसित गावठाणे निर्माण करून मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. पुनर्वसित गावठाणांमध्ये कलम १०(६) अन्वये १८ नागरी सुविधांचा समावेश केला जातो. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन व विकासाशी संबंधित बाबींकडे लक्ष देण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात येत असलेल्या “सार्वजनिक प्रकल्प बाधित पुनर्वसन व विकास महामंडळ” अंतर्गत “प्रकल्पग्रस्त लाभ विकास प्राधिकरण” समाविष्ट करण्याबाबतचा

प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासनाच्या निदर्शनास आलेल्या बाबींची पडताळणी संबंधित विभागीय व जिल्हास्तरीय यंत्रणांमार्फत करण्यात येते. तथापि, महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार पात्र विस्थापित प्रकल्पग्रस्त कुटुंबांना पुनर्वसन विषयक मंजूर लाभ उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सातत्याने करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी सुविधा अपूर्ण किंवा प्रलंबित असतील त्या बाबी नियम व तरतुदींनुसार टप्प्याटप्प्याने निकाली काढण्यात येतात. पुनर्वसित गावठाणांमध्ये मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देणे ही कार्यवाही पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदींनुसार केली जाते. संबंधित प्रकल्पातून इतर घटकांना पाणीपुरवठा होत असल्याचा प्रश्न वेगळ्या प्रशासकीय/धोरणात्मक स्वरूपाचा असला तरी, त्याचा परिणाम म्हणून पात्र प्रकल्पग्रस्त कुटुंबांना देय पुनर्वसन लाभ नाकारणे अभिप्रेत नाही. पात्र लाभार्थ्यांना अधिनियम व नियमांनुसार सर्व देय पुनर्वसन लाभ उपलब्ध करून देणे ही शासनाची भूमिका आहे

(४) धरण/सार्वजनिक प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसन व विकासाच्या प्रश्नांचा एकात्मिक पद्धतीने विचार करण्यासाठी "सार्वजनिक प्रकल्प बाधित पुनर्वसन व विकास महामंडळ" स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर महामंडळाच्या अधिपत्याखाली "प्रकल्पग्रस्त लाभ विकास प्राधिकरण" समाविष्ट करण्याबाबतची बाबही विचाराधीन असून, त्याबाबतची आवश्यक प्रशासकीय कार्यवाही संबंधित विभागांमार्फत करण्यात येत आहे.

(५) अशा प्रकारच्या संस्थात्मक यंत्रणेची स्थापना करताना तिची कायदेशीर चौकट, कार्यक्षेत्र, आर्थिक तरतूद, प्रशासकीय संरचना, तसेच संबंधित विभागांशी समन्वय यांचा सर्वंकष विचार करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तावासंबंधी विविध स्तरांवरील अभिप्राय, वित्तीय परिणाम, तसेच प्रशासकीय मान्यतांची पूर्तता या कारणांमुळे अंतिम निर्णयास काही कालावधी लागत आहे.

---

## राज्यातील गावात पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(१६) ४४९४ (२७-०४-२०२५). श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील (२१३३) गावे ही पर्यावरणीय संवेदशील क्षेत्रात येत असून त्यातील सुमारे १८४ गावे एकट्या कोल्हापूर जिल्ह्यात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची संकल्पना राबविली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या क्षेत्राची अंमलबजावणी झाली नसल्याने या गावांमधील जैवविविधतेला धोका निर्माण झाला असून बेसुमार वृक्षतोड व सपाटीकरणामुळे वन्यजीवांचा गावातील उपद्रव वाढला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची अंमलबजावणी होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२५-०२-२०२६) :** (१), व (२) भारत सरकार, पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून दिनांक ३१ जुलै, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या पश्चिम घाट पर्यावरण परिसंवेदनशील क्षेत्र संदर्भातील मसुदा अधिसूचनेद्वारे राज्यातील एकूण २५१५ गावे पर्यावरण परिसंवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर मसुदा अधिसूचनेद्वारे कोल्हापूर जिल्ह्यातील

एकूण २१२ गावे प्रस्तावित पर्यावरण परिसंवेदनशील क्षेत्रामध्ये समाविष्ट असल्याचे दर्शविण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
(४) पश्चिम घाट पर्यावरण परिसंवेदनशील क्षेत्र घोषित करण्याबाबतची अंतिम अधिसूचना जारी करण्याची कार्यवाही सध्या केंद्र शासन स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील मोशी परिसरातील होस्टेलमध्ये बाहेरून पिझ्झा मागविणाऱ्या मुलींना एक महिन्यासाठी वसतीगृहातील प्रवेश रद्द केल्याबाबत

**(१७) ४९९९ (२९-०४-२०२५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील मोशी परिसरामधील संतनगरमध्ये स्पाइन रोड येथे सामाजिक न्याय विभागाच्या मुलींचे शासकीय वसतीगृह असून, या वसतीगृहात २५० विद्यार्थींनी राहत असून यातील एका खोलीत राहणाऱ्या विद्यार्थीनीने बाहेरून पिझ्झा मागवून खाल्ल्यामुळे एका महिन्यासाठी चार विद्यार्थीनींचे वसतीगृहातील प्रवेश रद्द करण्यात येत असल्याची नोटीस संबंधित वसतीगृहतील प्रमुखाने दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, वसतीगृहातील ज्या विद्यार्थीनींनी पिझ्झा मागविला नाही अशाही विद्यार्थीनींना वसतीगृहातील प्रमुखांनी तीन नोटीसा देऊन मानसिक त्रास दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (२८-०२-२०२६) :** (१) अंशतः खरे आहे.पुणे शहरामध्ये जीबीएस या आजाराचे प्रमाण वाढल्याने सदर आजाराची लागण वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थीनींना होऊ नये म्हणून बाहेरील खाद्यपदार्थ खाण्यास मनाई करण्यात आलेली आहे. तथापि, दिनांक ३०.१.२०२५ रोजी वसतिगृहातील रूम क्र.११८ मध्ये पिझ्झा बॉक्स आढळून आल्याने केवळ प्रशासकीय बाब म्हणून सदर रूममधील विद्यार्थीनीना नोटीस देण्यात आलेली आहे.
(२) सदर वसतिगृहातील रूम.क्र.११८ मध्ये पिझ्झा बॉक्स आढळून आल्याने सदर रूममधील मुलींना वसतिगृह प्रशासनाकडून एकदाच नोटीस देण्यात आलेली आहे. तथापि, सदर रूममधील मुलींना वसतिगृहात सायंकाळी परवानगी न घेता विहीत वेळेपेक्षा उशिराने येणे, कर्मचाऱ्यांशी उद्धट वागणे, खोलीची स्वच्छता न ठेवणे या कारणासाठी वसतिगृह प्रशासनाकडून यापूर्वी नोटीस देण्यात आलेली आहे. सदर मुलींना वसतिगृह प्रशासनाकडून मानसिक त्रास देण्यात आलेला नाही.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी आयुक्तालय स्तरावर शिक्षण उपसंचालक (शानिशा) व उपसंचालक (सांख्यिकी), समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. सदर चौकशी समितीने गृहप्रमुख यांनी विद्यार्थीनींना शिस्त लावण्यासाठी दिलेली नोटीस योग्य आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात एकाच जमिनीची अनेक वेळा होत असलेली खरेदी व विक्री रोखण्याबाबत

**(१८) ५०७१ (२८-०४-२०२५). श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात एकाच जमिनीची अनेक वेळा खरेदी झाल्याने जमिनीची खरेदी विक्री करताना दुय्यम निबंधक (श्रेणी १) यांच्या संगणकीय प्रणालीद्वारे सर्व शासकीय मुद्रांकाची फी भरूनच दस्त नोंदवल्यावरच खरेदी विक्री पूर्ण होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे मध्यस्थी आणि खोट्या जमीन मालकांच्या संगनमताने जमीन विक्रीचा व्यवहार होत असल्यामुळे मुळ जमीन मालकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, काही वेळा दुय्यम निबंधकांनी खरेदी विक्री व्यवहारात शोधलेला अहवाल घेण्याचा अधिकार वकीलांना असल्यामुळे खोटे खरेदी विक्री व्यवहार रोखण्यास अडचणी येतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जमीनीची खरेदी विक्री व्यवहार करतानाच जमिनीचा शोधलेला अहवाल सादर केल्याने बनावट खरेदी विक्री होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०७-०५-२०२६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) दस्त नोंदणी करताना सर्च रिपोर्ट घेणे नोंदणी अधिनियम, १९०८ व नोंदणी नियम, १९६१ नुसार बंधनकारक नाही. ट्रान्सफर ऑफ प्रॉपट्री ॲक्ट,१८८२ मधील कलम ५६ नुसार टायटल तपासण्याची जबाबदारी दस्तातील लिहून देणार व घेणार यांची आहे. त्यानुसार संबंधित पक्षकार सर्च रिपोर्ट काढतात.
(५) लागू नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय होऊनही त्याची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(१९) ५१०८ (२९-०४-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला असून माहे जानेवारी, २०२५ मध्ये पुणे शहर, मुंबई व ठाणे या भागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना अकृषिक कराचे मागणी पत्र पाठवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अकृषिक कर रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२५-०२-२०२६) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

राज्यातील निवासी, वाणिज्य व औद्योगिक वापराखालील जमिनीवरील संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याचा निर्णय दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीमध्ये घेण्यात आला होता. तथापि, सदर निर्णयाचे प्रशासकीय कारणास्तव कायद्यात रुपांतरण झाले नाही. मात्र दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यातील अकृषिक कर आकारण्याबाबतच्या तरतूदी रद्द करण्याबाबतचा निर्णय घेतला असून त्यानुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५, दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ नुसार, अकृषिक कर आकारणीच्या तरतुदी रद्द करण्यात आल्या असून सदर सुधारणा अधिनियमाच्या कलम ४७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एक रकमी रुपांतरण अधिमूल्य आकारण्यात येणार आहे.

तसेच, सदर सुधारणेच्या अनुषंगाने महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक एनएपी-२०२५/प्र.क्र.१७७/जमीन-०१अ, दिनांक १० फेब्रुवारी, २०२६ अन्वये राज्यातील बिनशेती झालेल्या मिळकतींवर दरवर्षी आकारला जाणारा अकृषिक कर आकारण्यात येवू नये. तसेच सदर सुधारणेच्या दिनांकापर्यंत दरवर्षी आकारला जाणारा थकीत अकृषिक कर वसूल करण्यापासून सूट देण्यात येत असल्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्ह्यातील वाळू गटांना पर्यावरण विभागाची अनुमती मिळण्याबाबत

**(२०) ५२९३ (२८-०४-२०२५). श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील २३ वाळू गटांच्या खाणकाम आराखड्यास दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान मुदतवाढ मिळाली परंतु पर्यावरण विभागाची अनुमती (EC) मिळालेली नसल्याने स्थानिक नागरीकांच्या व शासकीय विकासकामांची बांधकामे करण्यासाठी अडचणी निर्माण झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव यांनी प्रधान सचिव तथा सदस्य सचिव पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान पर्यावरण विभागाच्या अनुमतीसाठी (EC) प्रस्ताव पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच विविध विकासकामांना परराज्यातून वाळू उपलब्ध होत असल्याने राज्याचा कर (महसूल) खुप मोठ्या प्रमाणात बुडत आहे त्यामुळे परराज्यातील वाळू व त्यावरील स्वामीत्वधनाच्या (Royalty) पावत्या राज्यात ग्राह्य केल्या जाऊ नये अशी मागणी केली जात आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने जळगाव जिल्हयातील २३ वाळू गटांना पर्यावरण विभागाची अनुमती मिळण्याकरीता तसेच नागरिकांना व शासकीय विकास कामांसाठी लागणाऱ्या वाळूसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०६-२०२६) :** (१) जळगाव जिल्हयातील २३ वाळु गटांना दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजी व ०१ वाळूगटाला दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी व ३ वाळुगटांना दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी अशा एकुण २७ वाळु गटांना दिनांक ३० सप्टेंबर, २०२५ पर्यंत पर्यावरण अनुमती प्राप्त झाली होती.

वाळू अभावी नागरीकांच्या व शासकीय विकासकामांना बांधकामे करण्यासाठी अडथळे निर्माण झाल्याची बाब जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(४) पर्यावरण अनुमती प्राप्त २३ वाळू गटांसाठी प्रसिद्ध केलेल्या लिलावास प्रतिसाद न मिळाल्याने सदर वाळू गट वाळू/रेती निर्गती धोरण २०२५ नुसार स्थानिक वापरासाठी राखीव ठेवले होते. सदर वाळू गटामधून दिनांक ०९.०६.२०२५ पर्यंत ८,९४० ब्रास वाळू घरकूल लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळवण (जि.नाशिक) येथील शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील निवासी प्रवेश क्षमता वाढविण्याबाबत**

**(२१) ५६२० (२७-०४-२०२५). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळवण (जि.नाशिक) येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत येणाऱ्या शासकी माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील निवासी प्रवेश क्षमता ही २० वरुन ४० करावी, अशी मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण आदिवासी भागात खाजगी शाळा नसल्याने सर्व आदिवासी विद्यार्थी हे शासकीय आश्रमशाळेतच शिक्षण घेत असल्याने त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवासी प्रवेश क्षमता वाढविण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सचिव (आदिवासी विकास), मा.राज्यपाल, मा.उप मुख्यमंत्री (वित्त) व मा.नियोजन मंत्री (आदिवासी विकास) महोदयांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील निवासी प्रवेश क्षमता वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. अशोक वुईके (०३-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळवण अंतर्गत येणा-या शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील निवासी प्रवेश क्षमता २० मुले व २० मुली याएवजी किमान ३५ मुले व ३५ मुली अशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधीकडुन मागणी होत आहे.
(२) हे खरे नाही.

ग्रामीण आदिवासी भागात खाजगी शाळांचे प्रमाण कमी असले तरी शासकीय आश्रमशाळेत निवासी मुले २० व मुली २० असे एकूण ४० निवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. तसेच १० विद्यार्थ्यांना अर्ध सवलत म्हणुन प्रवेश दिला जातो. तद्नंतर उर्वरीत विद्यार्थ्यांना शासकीय आश्रमशाळेमध्ये विनासवलत प्रवेश दिला जातो. त्यामुळे शिक्षणा पासून कोणताही विद्यार्थी वंचित राहत नाही व त्याचे शैक्षणिक नुकसान होत नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) प्रकल्प अधिकारी, कळवण अंतर्गत ४० शासकीय आश्रमशाळा कार्यरत असुन या आश्रमशाळांची मंजूर पटसंख्या २१९५० आहे. मात्र सप्टेंबर, २०२५ अखेरची प्रवेशित विद्यार्थी पटसंख्या सुमारे २०२०० इतकी आहे व सद्यस्थितीत सुमारे १७५० विद्यार्थ्यांच्या जागा रिक्त आहे. एखाद्या शासकीय आश्रमशाळेमध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांला रिक्त जागा असलेल्या शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेश देण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ग्रामरोजगार सहाय्यकांचे शासन निर्णयाप्रमाणे मानधन अदा करण्याबाबत**

**(२२) ७८४७ (०८-०९-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.श्याम खोडे (वाशिम), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक जिल्ह्यात ग्रामीण रोजगार हमी योजनेद्वारे काम करणाऱ्या ग्राम रोजगार सहाय्यकांना दरमहा रुपये ८०००/- मानधन तसेच दोन हजार रुपये प्रवास व डेटा पॅक देण्याचा शासन निर्णय दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी निर्गमीत करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ पासून करण्याचे व प्रोत्साहन मानधनासाठी दिनांक १ एप्रिल, २०२४ पासून गणना करण्यात येणार असूनही शासनाकडून ग्रामरोजगार सहाय्यकांना मानधन सुरु झाले नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यातील ग्रामरोजगार सेवक मागील १६ वर्षांपासून ग्रामपंचायतस्तरावर कार्यरत असून राज्य व केंद्र शासनाच्या तब्बल २६३ पेक्षा जास्त योजनांची अंमलबजावणी करण्याचे काम करीत असून ही त्यांना अद्यापही कर्मचारी दर्जा मिळालेला नाही तसेच त्यांना शासनाच्या इतर कोणत्याही सुविधांचा लाभ देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ग्रामरोजगार सहायकांचे मानधन प्रलंबित असून महाराष्ट्र राज्य ग्रामरोजगार सेवक कर्मचारी संघटनेने प्रलंबित असलेले अनुदान तात्काळ अदा करण्यात यावे, अशी मागणी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरी आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामरोजगार सहाय्यकांचे शासन निर्णयाप्रमाणे मानधन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (२७-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

मात्र सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता स्वतंत्र लेखाशीर्ष उघडणे, त्यास विधीमंडळाची मान्यता व अर्थसंकल्पीय तरतूद करण्यास कालावधी लागणे अपरिहार्य असल्याने ग्रामरोजगार सहाय्यकांचे प्रलंबित मानधन जुन्या दराने अदा करण्यात येत आहे.

(३) शासन निर्णय दिनांक ०२ मे, २०११ नुसार, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामात मदत करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर ग्रामरोजगार सहाय्यकांची मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात येत असून त्यांचे काम हे अर्धवेळ स्वरुपाचे आहे. तसेच त्यांची सेवा ही तात्पुरत्या स्वरुपाची आहे. ग्रामरोजगार सहाय्यक हे ग्रामपंचायतीचे नियमित कर्मचारी नाहीत.

(४) व (५) दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता नवीन लेखाशीर्ष विभागास प्राप्त झाले असून त्यानुषंगाने अर्थसंकल्पिय तरतूद करण्याची बाब विभागाकडून कार्यवाहीत आहे.

दरम्यानच्या कालावधीत ग्रामरोजगार सहायकांना माहे फेब्रुवारी, २०२६ पर्यंत जुन्या दराने मानधनाची परिगणना करून वितरण आदेश आयुक्त, मनरेगा, नागपूर कार्यालयाने निर्गमित केलेले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कृषी सहाय्यक यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(२३) ७९७१ (२०-०७-२०२५). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.संजय देरकर (वणी), डॉ.तानाजी सावंत (परांडा), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विभागांतर्गत कार्यरत असलेल्या कृषी सहाय्यक यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेद्वारे शासनाकडे वारंवार लेखी निवेदन दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा.कृषी मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या बैठकीत, १५ दिवसांत मागण्यांबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते मात्र अद्यापपर्यंत कोणताही ठोस निर्णय न झाल्यामुळे संघटनेने आंदोलनाचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त प्रकरणी चौकशी समितीकडून कृषी सहाय्यकाचे म्हणणे जाणून न घेता एकतर्फी चौकशी करण्यात येत असल्याचा आरोप कृषी सहायक संघटनेने केला असून कृषी सहाय्यकांचे म्हणणे जाणून चौकशी अहवाल सादर करण्यात यावा अन्यथा दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजीपासून बेमुदत कामबंद आंदोलन व साखळी उपोषणाचा इशारा संघटनेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी सहाय्यक यांनी केलेल्या मागण्या शासनाने मंजूर केल्या आहेत, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील कृषी सहाय्यक यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१९-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे. मात्र सदर रिक्त पदांचा कार्यभार कार्यालयाच्या अधीनस्त कृषी अधिकारी/उप कृषी अधिकारी यांचेकडे पदभार दिलेला नसून, महाराष्ट्र कृषी सेवा गट (ब) (कनिष्ठ) संवर्गातील इतर अधिकारी यांचेकडे प्रभारी पदभार सोपविण्यात येऊन कामकाज करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही. मात्र कार्यालयीन कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने व शेतकरी यांची गैरसोय होणार नाही, यादृष्टीने कार्यालयातील इतर अधिकारी/कर्मचारी यांचेकडे त्यांचा मुळपदाचा पदभार सांभाळून अतिरिक्त पदभार सोपविण्यात येऊन कामकाज करण्यात आलेले आहे.

(५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील ५३ उमेदवारांची अंतिम निवडसूची जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील निवडसूची सन २०२५-२६ करीता रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरणेबाबतची कार्यवाही कार्यान्वित आहे. तालुका कृषी अधिकारी मुखेड कार्यालयांतर्गत मंडळ कृषी अधिकारी / कृषी अधिकारी गट-ब कनिष्ठ संवर्गातील मंजूर ४ पदांपैकी सद्यस्थितीत ३ पदे भरण्यात आलेली आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर-मूल महामार्गावर उपशमन योजना राबविण्याबाबत

**(२४) ८४२४ (०८-०९-२०२५). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर-मूल महामार्गावर सन २०२४ मध्ये २१ वन्यप्राण्यांचा तर सन २०२५ मध्ये सहा वन्यजीवांचा महामार्गातील झाडेझुडूपे न काढल्यामुळे जीव गमवावा लागल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने ताडोबा व लॅन्ड स्कॅपमधील सात रस्त्यांच्या विभागांमध्ये २६ अंडरपास बांधण्याचे आदेश रस्ते वाहतूक महामार्ग विभागास दिले असतानाही केवळ एकच अंडरपास पूर्ण झाल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अनेक अभयरण्यांना जोडणाऱ्या महामार्गावर उपशमन योजना नसल्यामुळे चंद्रपूर-मूल महामार्गावर अलिकडेच सुमारे एक हजार किलो वजनाच्या गव्यांचा मृत्यू झाल्यामुळे त्या पट्ट्यांतील ४२ कि.मी. जंगल पट्ट्यांत प्रभावी उपाययोजनाचा अभाव असल्याचे वारंवार निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशानुसार ताडोबा व लॅन्ड स्कॅपमधील सात रस्त्यांच्या विभागांमध्ये २६ अंडरपास बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :** (१) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे बफर कार्यक्षेत्रातून जाणाऱ्या चंद्रपूर-मुल महामार्गावर महामार्गातील झाडेझुडूपे न काढल्यामुळे सन २०२४ व २०२५ मध्ये वन्यजीवांचा जीव गमवावा लागल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२), (३) व (४) राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने ताडोबा व लँड स्कॅपमधील ९ रस्त्यांच्या विभागामध्ये २६ अंडरपास बांधण्याचे आदेश रस्ते वाहतुक महामार्ग विभागास दिले आहेत.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे कार्यक्षेत्रातून जाणाऱ्या चंद्रपूर-मुल महामार्गावर अलिकडे गव्यांचा मृत्यु झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत कोअर व बफर क्षेत्रात वाघांच्या व इतर वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे:-

- परिक्षेत्र स्तरावर वाघ व बिबट या वन्यप्राण्यांचे मागोवाचा पंधरवाडी कार्यक्रम राबवून वाघ व बिबट अस्तित्वाबाबतची माहिती घेऊन त्या अनुषंगाने उपाययोजना राबविण्यात येते.
- पानस्थळ व महत्वाचे ठिकाणी कॅमेरा ट्रॅप लावून शिकारी लोकांचे हालचालीवर पाळत ठेवली जाते.
- वन्यप्राणी पाण्याचे शोधात नागरी वस्तीकडे येऊ नये याकरीता वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याकरीता महत्वाचे ठिकाणी पानस्थळ तयार करण्यात आले आहेत.
- अवैध शिकारी लोकांची माहिती मिळण्याकरीता परिक्षेत्र स्तरावर खबऱ्याची नेमणूक करण्यात येऊन त्यांचेद्वारे अवैध गुन्ह्यांबाबत माहिती प्राप्त करून त्यावर कार्यवाही करण्यात येते.
- महत्वाचे ठिकाणी ३५ संरक्षण कुटीची उभारणी करण्यात आलेली असून सदर कुटीवर २४ तासांकरिता वनमजूर कार्यरत असून त्यांचेद्वारे शिकारी हालचालीवर नियंत्रण ठेवली जाते.
- गावात येणाऱ्या बाहेरील व्यक्तीबाबत माहिती मिळवीता यावी याकरीता परिक्षेत्रस्तरावर मुसाफिर रजिस्टर ठेवून त्यामध्ये अनोळखी/बाहेरील व्यक्तींची नोंद घेतली जाते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथरी व सोनपेठ (जि. परभणी) येथे वसतीगृह उभारण्याबाबत**

**(२५) ८७६३ (२०-०७-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी व सोनपेठ (जि. परभणी) येथे सामाजिक न्याय विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुला-मुलींची शासकीय वसतीगृह उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे विनंती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रधान सचिव सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या सूचनेवरून कार्यवाही करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अवर सचिव यांनी आयुक्त समाजकल्याण पुणे यांना अहवाल पाठवण्याबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त ठिकाणी वसतीगृह उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. संजय शिरसाट (१८-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) शासनाचे पत्र दिनांक १४ मे, २०२५ अन्वये तपासून कार्यवाही करणेबाबत निर्देश सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, परभणी कार्यालयास देण्यात आले आहे.

(३) होय.

(४) शासनाचे पत्र दिनांक १४ मे, २०२५ अन्वये तपासून कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आले आहे. त्यानुषंगाने सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण परभणी कार्यालयाचे पत्र क्र. १९८३ दिनांक १३ मे, २०२५ अन्वये उपविभागीय अधिकारी, पाथरी जि. परभणी यांना मागासवर्गीय मुलां-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे आणि शासकीय निवासी शाळा या करीता जागा उपलब्ध करून देण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार तहसीलदार, पाथरी यांनी दिनांक ०७ मे, २०२५ अन्वये रेणापुर या ता. पाथरी येथे सरकारी जमीन उपलब्ध असल्याचे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण परभणी या कार्यालयास कळविले आहे. तथापी सदरची जागा शहरापासून सुमारे १२ कि.मी. अंतरावर दूर असल्याने वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी शाळा/ महाविद्यालयात जाणेसाठी सोयीची नाही. तसेच तहसीलदार, सोनपेठ यांचे पत्र दिनांक २९ मे, २०२५ अन्वये सोनपेठ येथे अनुकुल शासकीय/गायरान जमीन नसल्याबाबत कळविले आहे. जागा उपलब्ध करून घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ जिल्ह्यातील पैनगंगा अभयारण्यास व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देण्याबाबत**

**(२६) ९१७५ (२०-०७-२०२५). श्री.किसन वानखेडे (उमरखेड) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील पैनगंगा अभयारण्यास व्याघ्र प्रकल्पाचा (टायगर रिझर्व्ह) दर्जा देण्याबाबत महसूल व वन (वने) विभाग यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तात्काळ सादर करण्याचे आदेश दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (०६-०५-२०२६) :** (१), (२) व (३) पांढरकवडा (वन्यजीव) विभागांतर्गत जिल्ह्यातील टिपेश्वर व पैनगंगा अभयारण्यास व्याघ्र प्रकल्पाचा (टायगर रिझर्व्ह) दर्जा देण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय अभ्यास समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीमध्ये मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पश्चिम मुंबई व वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

उप विभागीय अधिकारी, महसूल विभाग, पांढरकवडा यांना व्याघ्र प्रकल्प घोषित करण्याकरीता प्रस्तावात नमुद असलेल्या पिटापुंगरी, रुढा, सुकळी, डोंगरगाव व गणेरी गावांचे खाजगी क्षेत्रातील जमिन व त्यांचे क्षेत्रफळ याबाबत तफावत असल्याने उप विभागीय अधिकारी, महसूल विभाग, पांढरकवडा यांचे स्तरावर चौकशी सुरू आहे.

---

### मुखेड (जि.नांदेड) येथे तालुका कृषी अधिकारी त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२७) ९३२५ (०८-०९-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) येथील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषी अधिकाऱ्याचे पद दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१ पासून रिक्त असल्याने हे पद प्रभारी कृषी पर्यवेक्षक पाहत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुका कृषी अधिकारी (मुखेड), येवती व मुक्रमाबाद मंडळासाठी तीन मंडळ अधिकारी पदे रिक्त असल्याने प्रभारी अधिकाऱ्याकडे कृषी विभागाचा कार्यभार देण्यात आल्याने कृषी विभागातील चार पर्यवेक्षक व कृषी अधिकारी यांच्याविरुद्ध सूक्ष्म सिंचन गैरव्यवहार प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त तालुक्यात कृषी अधिकारी कार्यालयांतर्गत ६७ पदे मंजूर असून त्यापैकी २९ पदे माहे एप्रिल, २०२५ मध्ये रिक्त असून मागील तीन वर्षांपासून त्या पदाचा अतिरिक्त पदभार देऊन कामकाज केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रिक्त पदामुळे कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येऊन कृषी विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गती मंदावली असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन जे शेतकरी अनेक शासकीय योजनांपासून वंचित आहेत त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी तसेच तालुका कृषी अधिकारी व त्या कार्यालयामधील रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१९-०६-२०२६) :** (१) हे खरे आहे. मात्र सदर रिक्त पदांचा कार्यभार कार्यालयाच्या अधीनस्त कृषी अधिकारी/उप कृषी अधिकारी यांचेकडे पदभार दिलेला नसून, महाराष्ट्र कृषी सेवा गट (ब) (कनिष्ठ) संवर्गातील इतर अधिकारी यांचेकडे प्रभारी पदभार सोपविण्यात येऊन कामकाज करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही. मात्र कार्यालयीन कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने व शेतकरी यांची गैरसोय होणार नाही, यादृष्टीने कार्यालयातील इतर अधिकारी/कर्मचारी यांचेकडे त्यांचा मुळपदाचा पदभार सांभाळून अतिरिक्त पदभार सोपविण्यात येऊन कामकाज करण्यात आलेले आहे.
(५) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील ५३ उमेदवारांची अंतिम निवडसूची जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब संवर्गातील पदोन्नतीच्या कोट्यातील निवडसूची सन २०२५-२६ करीता रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरणेबाबतची कार्यवाही कार्यान्वित आहे. तालुका कृषी अधिकारी मुखेड कार्यालयांतर्गत मंडळ कृषी अधिकारी / कृषी अधिकारी गट-ब कनिष्ठ संवर्गातील मंजूर ४ पदांपैकी सद्यस्थितीत ३ पदे भरण्यात आलेली आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात मचाण उपक्रमासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाकरिता सर्वाधिक शुल्क आकारले जात असल्याबाबत

**(२८) ९३४२ (०८-०९-२०२५). श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नागरिकांमध्ये वन्यजीव आणि वनांबद्दल जागरुकता वाढविण्यासाठी जनजागृती आणि शिक्षण मोहिम आवश्यक असल्याने वन खात्याकडून बुद्धपौर्णिमेला मचाण उपक्रम आयोजित करण्यात येत असून मागील काही वर्षांपासून शुल्कात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उपक्रमात नागरिकांना जंगलामध्ये प्लास्टिक बाटली, मद्य, जेवणात मांसाहारी जेवण देण्यात येऊ नये यासाठी जेवणाची जबाबदारी व्याघ्र प्रकल्प प्रशासनाकडे देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सदर उपक्रमासाठी प्रती व्यक्ती साडे तीन हजार रुपये शुल्क तर सह्याद्री, नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पात दोन हजार रुपये शुल्क आकारण्यात येत असून दोन्ही प्रकल्पात जेवण, पाण्याची व्यवस्था व्याघ्र प्रकल्पाकडे आहे तसेच, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात प्रती व्यक्ती साडे चार हजार रुपये शुल्क आकारणे, यात जेवण व पाण्याचा समावेश नसून सहभागींनी ती व्यवस्था स्वतः करावयाची आहे असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन या उपक्रमातून जनजागृतीचा उद्देश बाजूला ठेवून याला व्यावसायिक स्वरुप येत असून यावर शासनाने प्रतिबंध घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :**
(१) दरवर्षी बुध्द पौर्णिमेचे दिवशी पाणवठा प्रगणना उपक्रम आयोजीत करण्यात येतात, मागील दोन वर्षात पौर्णिमेचा दिवशी मचाणाचे प्रवेश शुल्क खालीलप्रमाणे आकारण्यात आले आहे.
१. ताडोबा- सन २०२४ व २०२५ करीता रु. ४,५००/- मचाण पर्यंत जिप्सीने ने-आण करणे जिप्सी

शुल्क, मार्गदर्शन शुल्क, प्रवेश शुल्क (२ व्यक्तींकरीता). ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये सन २०२५ मध्ये फक्त बफर क्षेत्रातील मचाणावर बाहेरील व्यक्तींना प्रवेश देण्यात आला होता. कोअर क्षेत्रात बाहेरील व्यक्तींना प्रवेश नव्हता, आकारण्यात आलेले शुल्क प्रती व्यक्ती नसुन प्रती मचाण (दोन व्यक्तींसाठी)

२. मेळघाट- सन २०२४ करीता रु. २,४००/- ते ३५००/- व २०२५ करीता रु. ३०००/- ते ३५००/- जिप्सीने ने-आण करणे जिप्सी शुल्क, जेवण, पाणी (१ व्यक्तींकरीता). मेळघाट व्याघ्र प्रकल्पात आकारण्यात येणाऱ्या शुल्कात लक्षणीय वाढ झालेली नसून नाममात्र शुल्क आकारण्यात आलेली आहे.

३. नवेगाव-नागझिरा - सन २०२४ व २०२५ करीता रु. २,०००/- मचाण पर्यंत जिप्सीने ने-आण करणे जिप्सी शुल्क, जेवण नास्ता व पाणी शुल्क (१ व्यक्तींकरीता). नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पामध्ये बुध्द पौर्णिमेला प्रगणकांकडून मचाण उपक्रमात माफक शुल्क आकारले जाते.

४. पेंच - सन २०२४ व २०२५ करीता रु. २,०००/- मचाण पर्यंत जिप्सीने ने-आण करणे जिप्सी शुल्क, जेवण, नास्ता व पाणी शुल्क (१ व्यक्तींकरीता) टी शर्ट प्रति व्यक्ती. पेंच व्याघ्र प्रकल्पामध्ये पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर व बोर व्याघ्र प्रकल्प, वर्धा या विभागाद्वारे दरवर्षी पेंच व्याघ्र प्रकल्प व उमरेड-पवनी-कऱ्हांडला अभयारण्यामध्ये बुध्द पौर्णिमेला लोकांना पर्यावरण व वन्यजीव संवर्धनाविषयी जागरुक करण्यासाठी पाणस्थळावरील निसर्गानुभव कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पेंच प्रकल्प प्रशासनाकडून सन २०२२ पासुन रु. २०००/- एवढेच शुल्क आकारण्यात येत आहे. या शुल्कामध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही.

(२) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पांतर्गत आयोजीत उपक्रमातून प्राप्त शुल्कापैकी जवळपास ७० टक्के रक्कम ही स्थानिक गावकऱ्यांना उपलब्ध होत असुन सदर उपक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर नागरीक नोंदणी करतात. त्यामुळे या उपक्रमामुळे जनजागृतीचा उद्देश सफल होण्यास मदत होते.

पेंच व्याघ्र प्रकल्प व बोर व्याघ्र प्रकल्पाद्वारे बुध्दपौर्णिमेला आयोजीत होणाऱ्या पाणस्थळावरील निसर्गानुभव कार्यक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सहभागींना एकवेळचे जेवण, सकाळचा नाश्ता, पिण्याचे पाणी व टी शर्ट इत्यादी बाबींचा समावेश आहे. तसेच सदर कार्यक्रमाकरीता आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये सहभाग घेणाऱ्या व्यक्तींना वनपरिक्षेत्र कार्यालयापासून त्यांचे नियोजित मचाण पर्यंत ने-आण करण्याची बाब सुध्दा समाविष्ठ असते. अशा प्रकारच्या कार्यक्रमामध्ये जनसामान्यामध्ये वन व वन्यजीव संवर्धन व संरक्षण याबाबत व्यापक जाणीव जागृती निर्माण करण्यात येते. ज्यामुळे अशा प्रकारच्या कार्यक्रमाचा मुळ उद्देश पेंच व्याघ्र प्रकल्पाद्वारे साध्य करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत सदर कार्यक्रम राबवितांना नागरीकांमध्ये जनजागृती व्हावी हाच उद्देश आहे. कार्यक्रमापुर्वी कार्यशाळा घेवुन सहभागी नागरिकांना पर्यावरण व वन्यजीव विषयक महत्व पटवुन देण्यात येते तसेच त्यांना मार्गदर्शन करण्यात येते.

(३) सर्व व्याघ्र प्रकल्पाकडून त्यांचे स्तरावरुन कमी प्रमाणात नाममात्र शुल्क आकारण्यात येत आहे. तसेच या माध्यमातून जनजागृती होणे ह्या उद्देशातुनच हा उपक्रम राबविला जातो.

(४) सदर उपक्रम हा जनजागृती करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोटे (ता.कराड, जि.सातारा) या गावास अधिकृतपणे गावठाण म्हणून घोषित करण्याबाबत**

**(२९) ९४२७ (१९-०८-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोटे (ता.कराड, जि.सातारा) या गावाचे अधिकृत गावठाण म्हणून घोषित न झाल्याने ग्रामस्थांना राहत्या

जागेचे मालमत्ता पत्रक मिळू शकत नाही त्यामुळे घराची दुरुस्ती करणे व नवीन घर बांधणे अशा प्रकारच्या कामांसाठी बँकांकडून कर्ज मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अडचण ही ग्रामस्थांना सुमारे ५० वर्षापासून भेडसावत असूनही शासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (०९-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मौजे गोटे, ता. कराड जि. सातारा या कृष्णा नदीकाठावर वसलेल्या गावास १९६७ साली भूकंपामुळे संभाव्य पुराचा धोका टाळण्यासाठी नविन सं. नं ११/१अ ते ११/३८ मधील क्षेत्र ८.२४ हे.आर. जमिनीत १६४ भूखंड पाडून ग्रामपंचायतीच्या सहायाने गावपातळीवर वाटप केले आहे. प्रश्नाधीन जमिनी या देवस्थान ईनाम वर्ग ३ च्या असून मिराशी कुळाकडून त्यावेळी निर्माण झालेल्या परिस्थीतीमुळे परस्पर ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत. जमीन मालकांना त्याबद्दल मोबदला देण्यात आलेला नाही. त्यामुळे जमिनीचा अधिकृत ताबा घेता आलेला नाही व जमिनीचे ७/१२ स अद्याप मूळ वहिवाटदार व मिराशी कुळे यांची नावे आहेत.

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडून दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी शासनास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने मा.मंत्री महोदय (मदत व पुनर्वसन) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९ ऑक्टोबर, २०१८ रोजी मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या बैठकीमध्ये मा. मंत्री महोदयांनी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासन पत्रान्वये मौजे गोटे, ता. कराड, जि. सातारा येथील ग्रामस्थांचे पुनर्वसन शासनाकडून करण्यात आलेले नसून, सदर प्रश्न जमीन मालक व स्थलांतरीत ग्रामस्थांचा आपसातील असल्याने त्यामध्ये शासनाची भूमिका नसल्याबाबत कळविण्यात येऊन प्रश्नाधीन जमीनीच्या भूसंपादनाच्या अनुषंगाने दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी शासनास सादर करणेत आलेला प्रस्ताव अमान्य करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्री. नजीर मेहबूब देसाई व इतरांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ४३६९/२०१६ दाखल केलेली आहे. सदर न्यायालयीन प्रकरणातील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील हजारो नागरिकांचे पुनर्वसन प्रलंबित असल्याबाबत

**(३०) ९५९१ (०८-०९-२०२५). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात दोन हजार आदिवासी व पंचवीस हजार झोपडीधारक राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व रहिवाशांचे पुनर्वसन मरोळ-मरोशी येथील ९० एकर जागेवर करण्याचा निर्णय घेण्यात आला होता, परंतु सदर जागा ही पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील असल्याने तेथील पुनर्वसन प्रकल्प अडचणीत आला

आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, येथील रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी दुसरी जागा शोधण्याचे निर्देश शासनाने महसूल विभागाला दिले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर जागा पुनर्वसनासाठी मिळाल्यानंतर ती म्हाडाला हस्तांतरित करण्यात येणार असून सत्तावीस हजार नागरिकांचे पुनर्वसन प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच संजय गांधी उद्यानाच्या सीमेमध्ये राहणाऱ्या हजारो कुटुंबियांच्या पुनर्वसनाचा मार्ग कठीण झाला असून वन विभागाने या कुटुंबियांना ठाणे जिल्ह्यात स्थलांतरित करण्याच्या योजनेला स्थानिकांनी विरोध केला असल्याचे दिनांक २ जून, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदर रहिवाशांचे पुनर्वसन मरोळ–मरोशी क्षेत्रातच करण्यात यावे जेथे पहिले पुनर्वसनाची योजना बनविण्यात आली होती असे तेथील स्थानिक नागरिकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात राहत असलेल्या सर्व रहिवाशांचे मरोळ-मरोशी येथे लवकरात लवकर पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (१६-०६-२०२६) :**(१), (२), (३), (४), (५), (६) व (७) हे खरे आहे.
सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राज्यात भूसंपादनाच्या नुकसान भरपाईचे दावे न्यायाधीकरणाकडे प्रलंबित असल्याबाबत

**(३१) ९७७५ (१९-०८-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात भूसंपादनाच्या नुकसानभरपाईची ३० हजार ३०७ दावे न्यायाधीकरणाकडे प्रलंबित असल्याची माहिती राज्य शासनाने मा.उच्च न्यायालयात सादर केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त करीत हे दावे तातडीने निकाली काढण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या नागपूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नाशिक येथे अपील न्यायाधीकरण स्थापन करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार शेतकऱ्यांची नुकसान भरपाई तातडीने देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (०२-०७-२०२६) :** (१) हे अशंत: खरे आहे. भूमीसंपादन, पुर्नवसन व पुर्न:स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ मधील कलम ५१ अन्वये स्थापन केलेल्या भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना प्राधिकरणांकडे एकूण २८,५१४ संदर्भ/दावे प्रलंबित असल्याचे दर्शवण्यात आले होते. यामध्ये नागपूर (१,५७२), छत्रपती संभाजी नगर (५,८७१), अमरावती (१७,५५९) आणि नाशिक (३,५१२) या प्राधिकरणांचा समावेश आहे.
(२) होय, हे खरे आहे. भूसंपादनाचे दावे त्वरित निरसन करण्यासाठी नागपूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती व नाशिक येथे प्राधिकरणांची स्थापना करण्यात आली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली अमरावती

आणि नाशिक प्राधिकरणांच्या सक्षमीकरणाचे काम करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रलंबित दाव्यांचा जलदगतीने निपटारा करून शेतकऱ्यांना तातडीने भरपाई मिळवून देण्यासाठी शासनाने खालील प्रमुख उपाययोजना केल्या आहेत:

पिठासीन अधिकाऱ्यांची नियुक्ती: दिनांक १४.०२.२०२५ रोजी राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे अमरावती प्राधिकरणासाठी श्री. राजीव पुरुषोत्तम पांडे (निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश) आणि नाशिक प्राधिकरणासाठी श्री. विलास पांडुरंगराव कदम (निवृत्त जिल्हा न्यायाधीश) यांची पिठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली व प्राधिकरणांचे कामकाज नियमित सुरू करण्यात आले.

१२ अतिरिक्त पदांची निर्मिती: प्रलंबित प्रकरणांचा भार कमी करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १० फेब्रुवारी २०२६ अन्वये अमरावती, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर येथील तिन्ही प्राधिकरणांकरिता प्रत्येकी ०१ अतिरिक्त पिठासीन अधिकारी (जिल्हा न्यायाधीश संवर्ग), ०१ लघुलेखक, ०१ शिपाई व ०१ वाहन चालक अशी एकूण १२ अतिरिक्त पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

वरील मुद्द्यांनुसार शासनाने प्रभावी उपाययोजना व पदनिर्मिती केल्यामुळे विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंगी (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथील वन्यजीव विभागातील शेत निवारात निलगाईची हत्या केल्याबाबत

**(३२) ९७८५ (०८-०९-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंगी (ता.पांढरकवडा, जि.यवतमाळ) येथील वन्यजीव विभागातील बीट कक्ष क्र.१३७ लगत असलेल्या शेतशिवारात निलगाईची हत्या करुन मांस पोत्यात भरुन नेत असताना एका आरोपीला टिपेश्वर वन्यजीव कर्मचाऱ्यांनी दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पकडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन वन्यप्राण्यांची हत्या करणाऱ्या दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२७-०४-२०२६) :**(१) हे खरे आहे.

पांढरकवडा (वन्यजीव) विभागांतर्गत वनपरिक्षेत्र (वन्यजीव) पारवा मध्ये रात्रपाळी गस्ती दरम्यान क्षेत्राच्या वन्यजीव विभागातील सावंगी बिट कक्ष क्र.१४७ च्या लगत शेत गट क्र. १२९ मौजा-सावरगांव येथील शेतमालक श्री. नारायण नामदेव गाउत्रे, रा.सावरगांव यांच्या मालकीचे शेतात काही इसमांकडून वन्यप्राण्याची शिकार झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार मौका स्थळी जाऊन दोन इसमांना ताब्यात घेण्यात आले व इतर पाच आरोपी घटनास्थळांवरून फरार झाले. सदर ठिकाणावरुन निलगाय या वन्यप्राण्याचे मांस, पाच दुचाकी वाहन व तार खुंट्या जप्त करण्यात आले. सदर वनअपराधाचा गुन्हा क्र.प्रा.गु.री.०६०३०/१५०७२६, दिनांक ०४ मे, २०२५ अन्वये नोंदविण्यात आला आहे.
(२) विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी घाटंजी, ता. घाटंजी, जि. यवतमाळ यांचे दालनामध्ये आरोपी श्री. नारायण नामदेव गाउत्रे रा. सावरगांव, श्री. सुभाष अमृत भेंडारे रा. सावरगांव यांना हजर करण्यात आले होते. न्यायालयाने सदर दोन्ही आरोपीस जमानत दिलेली आहेत. तसेच फरार आरोपी (१) श्री. सुरेश दशरथ आगीरकर (२) श्री.ज्ञानेश्वर शेंडे (३) पारवा येथील एक पारधी (४) श्री. आतीश नारायण गाउत्रे (५) श्री. भगवान शंकर भेंडारे यांचा शोध घेणे आवश्यक असल्याने आरोपीस जामीन देण्यात येऊ नये अशी विनंती विद्यमान न्यायदंडाधिकारी

प्रथम श्रेणी घाटंजी यांना करण्यात आली होती.

त्यानंतर शेत गट क्र. १२९ मौजा-सावरगांव हे क्षेत्र पांढरकवडा प्रादेशिक वनविभागाच्या अखत्यारीत असलेले पारवा (प्रादेशिक) वनपरिक्षेत्रात येत असल्याने सदर प्रकरणाची पुढील सखोल चौकशी व कार्यवाही करण्याकरीता सदर वनअपराधातील सर्व दस्ताऐवज व जप्त मुद्देमालासह दिनांक०४.०६.२०२५ रोजी उपवनसंरक्षक (प्रादेशिक), पांढरकवडा वनविभाग यांना हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर प्रकरणाची पुढील चौकशी व कार्यवाही उपवनसंरक्षक (प्रादेशिक), पांढरकवडा यांचे स्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्ह्यातील महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) प्रकल्पासाठी रिलायन्स कंपनीने घेतलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत करण्याबाबत**

**(३३) १००५८ (१९-०८-२०२५) श्री. योगेश सागर (चारकोप), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) साठी रिलायन्स कंपनीने घेतलेल्या जमिनी वापरात नसल्यास त्या शेतक-यांना परत करण्यात याव्यात अशी मागणी शेतक-यांकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मंत्रिमंडळाच्या बैठकीत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल असे महसूल मंत्र्यांनी सुचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन शेतक-यांना वापरात नसलेल्या जमिनी परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०४-२०२६) :** (१), (२) व (३) रायगड जिल्ह्यातील महामुंबई विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) प्रकल्पासाठी रिलायन्स कंपनीने घेतलेल्या जमिनी वापरात नसल्यास त्या शेतकऱ्यांना परत करण्यात याव्यात याबाबत मा. मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०२ एप्रिल, २०२५ रोजी बैठक पार पडली.

सदर बैठकीतील निर्देशानुसार भूसंपादन अधिनियम १८९४ च्या अनुषंगाने भास्करन पिल्लाई वि. केरळ शासन मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०५ मे, १९९७ रोजी दिलेले आदेश व त्यानुषंगाने दिनांक १२ मार्च, २००४ रोजी निर्गमित केलेले शासन निर्णय विचारात घेऊन संबधित भूसंपादन संस्था यांनी उचित कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात चंद्रपूर जिल्ह्यात सर्वाधिक वाघ कायमस्वरुपी जेरबंद केल्याबाबत**

**(३४) १०२८९ (०८-०९-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात मागील सहा वर्षांत वाघ हे मानवी वस्तीत शिरणे, गुरांची शिकार करणे

तसेच अन्य कारणांमुळे जिल्ह्यातील वनविभागाने ३५ वाघांना कायमस्वरुपी जेरबंद केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कोणत्या जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक वाघ जेरबंद केले त्याची जिल्हानिहाय आकडेवारी काय आहे तसेच वाघांना जेरबंद करण्याची प्रक्रिया काय आहे तसेच वाघांना कायमस्वरुपी जेरबंद न करता त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, उक्त जेरबंद केलेल्या वाघांची व्यवस्था कोणत्या ठिकाणी केली जाते तसेच वाघ मानवीवस्तीत शिरण्याच्या आणि गुरांची शिकार करण्याच्या घटना वाढण्याची प्रमुख कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन वाघांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षित ठेवण्यासाठी वन विभागाची दीर्घकालीन योजना व त्यासाठी केंद्र शासनाकडून मदत मिळण्याबाबत तसेच भविष्यात वाघ आणि मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :**(१) चंद्रपूर वनवृत्तांतर्गत मागील सहा वर्षात एकुण ५४ वाघांना जेरबंद करण्यात आले आहे.
(२) चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सन २०२० ते २०२६ या कालावधीमध्ये सर्वाधिक एकूण ५० वाघांना जेरबंद करण्यात आलेले आहे. जेरबंद केलेल्या वाघांना गोरेवाडा प्राणीसंग्रहालय व बचाव केंद्र, TTC चंद्रपूर तसेच काही प्रकरणी घनदाट जंगलात मध्यभागी निसर्गमुक्त करण्यात येते.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार प्रमाणभुत पध्दत राबवुन मानव-वन्यजीव संघर्षास कारणीभुत वाघांना जेरबंद करणे तसेच नैसर्गिक अधिवासात सोडणे याबाबत कार्यवाही करण्यात येते.
(३) चंद्रपूर वनवृत्तात जेरबंद करण्यात आलेल्या वाघांना तात्पुरत्या स्वरुपात ट्रांझिट ट्रिटमेंट सेंटर, चंद्रपूर तसेच दिर्घ कालावधीकरीता गोरेवाडा प्राणी संग्रहालय व बचाव केंद्र, नागपूर येथे स्थलांतर करण्यात येते. चंद्रपूर वनवृत्तात वाघाच्या संख्येत वाढ होत आहे तसेच २ वर्षाहुन अधिक वयाचे वाघाचे बछडे विभक्त होत असल्याने शिकारीकरीता मानवीवस्तीत शिरण्याच्या आणि गुरांचा शिकार करण्याच्या घटनेत वाढ होत आहे. गावालगत व शेतशिवारात मोकाट जनावरे शिकारीकरीता सहज उपलब्ध असणे, अनावश्यक झाडेझुडपे असल्याने वाघांना लपन मिळणे, त्यामुळे शिकारीकरीता पाळीव प्राण्यांकडे धाव घेतात.
(४) मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:-

• वाघ/बिबट/हिंस्त्र वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या जंगलाच्या लगतच्या सर्व गावात जेथे अशा घटना घडण्याची शक्यता आहे अशा गावामधील कुणाही व्यक्तीने एकट्याने कोणत्याही कारणासाठी जंगलात जाऊ नये अशी दवंडी देऊन गावकऱ्यांना त्यातील धोका ध्यानात आणून देण्यात येतो.

• स्थानिक क्षेत्रिय कर्मचारी व अधिकारी, फिरते पथक, संरक्षण पथक यांचे मार्फत वाघ/बिबट हिंस्त्र वन्यजीवांचा वावर असलेल्या ठिकाणी गस्त वाढविण्यात येऊन वन्यप्राण्यांच्या हालचालीचे सनियंत्रण करण्यात येते.

• गस्तीच्या वेळी वनातील नैसर्गिक/कृत्रिम पाण्याचे स्त्रोताची चमुने नियमित तपासणी करुन तेथील पाण्याची पातळी नेहमी नियंत्रीत राहील याबाबत दक्षता घेण्यात येते.

• ज्या भागामध्ये वाघाचा/हिंस्त्र प्राण्यांचा वावर आहे, अशा "धोकादायक क्षेत्र" परिसरात Flex Board , सुचना फलक लावण्यात आले.

• गावालगत असलेल्या वनक्षेत्रात कॅमेरा ट्रॅप लावुन त्यांचे नियमित संनियंत्रण करण्यात येत आहे.

• चंद्रपूर वनवृत्तांतर्गत वनविभागातील मानव-वन्यजीव संघर्षाचे दृष्टिने अतिसंवेदनशील गावात पीआरटी सक्रिय करण्यात आली आहे.

• स्थानिक लोकांचे सहभागाने घटना परिसरात वनकर्मचाऱ्यांची नियमित गस्त करण्यात येते.

• वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल, वनरक्षक हे जंगलालगतचे गावात सरपंच, पोलीस पाटील तथा ग्रामस्थांची सभा घेऊन ग्रामस्थांना जंगलात न जाण्याच्या सुचना देतात.

• मानवी जिवीतास धोकादाय ठरलेल्या वाघ/बिबट या वन्यप्राण्यांना जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

• डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजनेअंतर्गत तसेच जिल्हा योजने अंतर्गत एलपीजी, सौरपथ दिव्यांचे वाटप करण्यात येते.

• गावालगतच्या वन्यप्राण्यांचा भ्रमणमार्गावर AI Based कॅमेरा लावण्यात येतात. त्यामुळे वन्य प्राण्याचे गावाचे दिशेने आल्याचे समजताच गावकऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात येतो.

• वन्यप्राण्यांद्वारे होणारे नुकसान बाबत तात्काळ पंचनामा करुन नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड तालुक्यातील सामाजिक न्याय विभागाच्या कामामध्ये झालेली पुनरुक्ती व अनियमिततेबाबत

**(३५) १०६३३ (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड तालुक्यात शासन निर्णय क्र.सवियो-२०२४/प्र.क्र.७१३/अजाक, दिनांक १३/१०/२०२४ नुसार अनेक विकासकामे मंजूर झालेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक कामांची पुनरुक्ती होणे किंवा कोणत्याही योजनेतून त्याठिकाणी विकासकामे झालेली नाहीत याबाबतचे स्पष्टीकरण अथवा सक्षम अधिकाऱ्यांनेदेखील याबाबत विचारणा केल्याचे दिसून आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कामनिहाय, प्रशासकीय मान्यतानिहाय, तांत्रिक मान्यतानिहाय, कार्यारंभ आदेशानिहाय अटी व शर्तींचे पालन तसेच कामाची पुनरुक्ती होत नाही याबाबत ग्रामपंचायतीने अथवा सक्षम अधिकाऱ्याने आवश्यक ती प्रमाणपत्रे दिली आहेत किंवा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग १ जिल्हा परिषद व शाखा अभियंता विद्युत विभाग यांनी सर्व कागदपत्रांची खातरजमा केलेली आहे काय, तसेच पुढील ५ वर्षापर्यंत कोणत्याही इतर लेखाशिर्षमधून कामे घेण्यात आलेली नाहीत याची परिपूर्ण खात्री केलेली आहे काय याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ मे, २०२५ रोजी पत्राद्वारे संबंधित कार्यालयाकडे विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या कंत्राटदाराकडे ही कामे सुपूर्द केली आहेत त्या कंत्राटदार यांचे आयकर, व्यवसायकर व जीएसटीच्या बाबतीत देखील शासन दप्तरी खातरजमा होणे गरजेचे असून अनियमिततेच्याबाबतीत कार्यवाही होणे गरजेचे आहे जेणेकरून शासन निधीचा अपव्यय थांबेल अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई तसेच दिनांक ६ मे, २०२५ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कामाच्या पुनरुक्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट (०६-०५-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे आहे.

(५) मा. लोकप्रतिनिधी यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना चौकशी करून अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. आयुक्त, समाजकल्याण यांनी यासंदर्भात जिल्हाधिकारी, बीड यांना चौकशी करणेबाबत कळविले असून चौकशीची कार्यवाही सुरु आहे

---

## मुंबई शहरात वाहतूक कोंडी कमी करण्याकरिता वॉटर मेट्रो प्रकल्प सुरू करण्याबाबत

**(३६) ११०७१ (१७-०६-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोची वॉटर मेट्रोच्या धर्तीवर मुंबई शहरातही वाहतूक कोंडी कमी करण्याकरिता वॉटर मेट्रो प्रकल्प सुरू करण्यात येणार असल्याचे माहे मे २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प केंद्र आणि राज्य शासनाचा संयुक्त प्रकल्प आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला असून कोणकोणत्या मार्गांवर सदर सेवा प्रस्तावित आहे,
(४) असल्यास, सदर प्रकल्पासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली असून हा प्रकल्प प्रत्यक्षात केव्हापर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे तसेच प्रकल्पामुळे स्थानिक मच्छीमार, कोळीवाडे व किनारपट्टीवरील रहिवासी यांच्यावर होणाऱ्या परिणामांकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. नितेश राणे (१९-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्य शासनामार्फत सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे.
(३) मुंबई महानगर क्षेत्रातील जलवाहतूक विकासासाठी तयार करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार, २१ विद्यमान जलमार्गांवरील २० टर्मिनल्सचे अद्ययावतीकरण आणि ११ नवीन जलमार्गांवर २४ नवीन टर्मिनल्स उभारण्याचे प्रस्तावित आहे.
(४) सदर प्रकल्पासाठी सुमारे रु. ६०६६ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. हा प्रकल्प सार्वजनिक- खाजगी भागीदारी (PPP) तत्त्वावर राबविण्यात येणार असून, त्यापैकी रु. २८५५ कोटींचा खर्च शासन आणि रु. ३२११ कोटींचा खर्च सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर केला जाणार आहे. प्रकल्प २०३१ पर्यंत कार्यन्वित होणे अपेक्षित आहे.

सदर प्रकल्प हा प्रवासी जलवाहतूक प्रकल्प असून, सविस्तर प्रकल्प अहवालात मच्छिमारांच्या नुकसानीबाबत कोणतीही तरतूद नमूद केलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड (जि.पुणे) तालुक्यामध्ये शासकीय जागेत सज्जा व मंडळ कार्यालय बांधण्याबाबत

**(३७) १११५० (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यामध्ये शासकीय जागेत सज्जा व मंडळ कार्यालये कार्यरत असून शासकीय जागेत नसलेल्या सज्जा व मंडळ कार्यालयांना जागा देण्यासह इमारत बांधण्याची मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांना २४ तास प्रशासकीय सेवा मिळाव्यात यासाठी शासनाने गाव कामगार, तलाठी आणि मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या मुख्यालयात निवासस्थाने उपलब्ध केली आहेत, हे ही खरे आहे

काय,
(३) असल्यास, तलाठी, मंडळ अधिकारी व इतर कर्मचारी मुख्यालयात राहत असल्याची खात्री करण्याकरीता व तपासणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२०-०३-२०२६) :** (१) खेड तालुक्यामध्ये सध्या शासकीय जागेमध्ये १८ सज्जा व ५ मंडळ कार्यालये आहेत. उर्वरित कार्यालयांना शासकीय इमारत बांधणेकामी जागा मागणीचा प्रस्ताव अद्याप अप्राप्त आहे. शासकीय इमारत बांधणेकामी जागा मागणीचा प्रस्ताव तातडीने मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) शासकीय इमारत बांधणेकामी जागा मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर गाव कामगार, तलाठी आणि मंडळ अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या मुख्यालयात निवासस्थाने उपलब्ध करता येईल.
(३) खेड तालुक्यामध्ये तलाठी मंडळ अधिकारी व कर्मचारी मुख्यालयात रहात असल्याबाबतची खात्री तहसिलदार खेड यांनी केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाल (ता.रावेर, जि.जळगाव) येथील यावल वन्यजीव अभयारण्यात हरीण पैदास केंद्रात हरिणांच्या झालेल्या मृत्यूबाबत**

**(३८) ११३३४ (०८-०९-२०२५). श्री.अमोल जावळे (रावेर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाल (ता.रावेर, जि.जळगाव) येथील यावल वन्यजीव अभयारण्यात हरीण पैदास केंद्रात योग्य सोयी-सुविधा अभावी १४ सांबर हरिणांचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हरीण पैदास केंद्रात हरिणांना वेळेवर चारा व पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी वन्यजीव विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वन्यजीव विभागाकडून मागील पाच वर्षात हरिणांच्या देखरेखीसाठी आर्थिक वर्ष सन २०१९ ते २०२५ या कालावधीपर्यंत निधी प्रस्तावित करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रत्येक आर्थिक वर्षात प्रस्तावित निधींपैकी हरीण पैदास केंद्रासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच यावल वन्यजीव अभयारण्यात हरीण पैदास केंद्रात हरिणांच्या झालेल्या मृत्यूस जबाबदार असलेल्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :** (१) दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२५ ते १० फेब्रुवारी, २०२५ दरम्यान एकूण सांबर नर व पिल्ले-०५, सांबर मादी व पिल्ले-०९ असे एकुण १४ प्राण्यांचा आकस्मिक मृत्यु झालेला आहे.

पशुधन विकास अधिकारी, खिर्डी व पशुधन विकास अधिकारी, विवरा, पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकिय दवाखाना, पाल श्रेणी-१ यांचेमार्फत मृत प्राण्यांचे शवविच्छेदन करण्यात आलेले आहे. त्यामध्ये डिहायड्रेशन झाले असावे असा अंदाज वैद्यकिय अधिकारी यांनी वर्तविला आहे. मृत सांबर मादीचे अवयव नमुने तसेच हरिण पैदास केंद्रातील पुरवठा होणाऱ्या पाण्याचेही नमुने बाटलीत सिलबंद करून सहाय्यक आयुक्त, पश्चिम विभागीय रोगनिदान प्रयोगशाळा, रोग अन्वेषण विभाग, पुणे यांचेकडे तपासणीसाठी देण्यात आले. सदर पाण्याचे नमुन्याचा अहवाल पशुधन विकास अधिकारी, पाल श्रेणी-१ यांना प्राप्त झालेला असून पाणी हे आम्लयुक्त असल्याचे निदर्शनास आलेले आहे. तसेच अचानक झालेल्या खाद्यांमधील बदल त्यामधील Alkaloids घटकांची बाधा असल्याचे नमुद केले आहे. पशुधन विकास अधिकारी, पाल श्रेणी-१ यांच्या मतानुसार

रक्तविषबाधा असल्याचे सांगण्यात आलेले आहे. इतर जास्त गंभीर आजारी असलेल्या प्राण्यांना पशुधन विकास अधिकारी यांच्या सल्ल्याने औषधोपचार व चारापाणी देण्यात आलेला आहे.
(२) हरीण पैदास केंद्रासाठी पशुखाद्य, औषधी व देखभाल कॅम्पा व जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत प्राप्त निधीमधून करण्यात येते.
(३), (४) व (५) सन २०२२-२३ मध्ये पशुखाद्य व औषधीसाठी रु.१ लक्ष कॅम्पा अंतर्गत अनुदान प्राप्त झालेले होते. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत रु. ९८.८६ लक्ष चा प्रस्ताव जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सादर करण्यात आलेला होता. त्यापैकी मार्च २०२५ अखेर त्यापैकी २५% अनुदान प्राप्त झालेले आहे.

सद्य:स्थितीत सदरील प्राण्यांना दररोज नजिकच्या जंगलातून अंजन व झाडांचा पाला/चारा खाद्य म्हणून देण्यात येतो. तसेच आवश्यकतेनुसार स्थानिक पशु वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत वैद्यकिय तपासणी व आवश्यकतेप्रमाणे वैद्यकिय उपचार करण्यात येतात.

---

## मुखेड (जि.नांदेड) येथील म.ग्रा.रोहयो अंतर्गत सिंचन विहीरीच्या कामाच्या हजेरी पत्रकाबाबत व नवीन सिंचन विहीर मंजूरीबाबत

**(३९) ११५०६ (०८-०९-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुखेड (जि.नांदेड) येथील सन २०२४-२५ पासून महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहीरीच्या मजुरांचे हजेरी पत्रक संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन असणे तसेच कुशल व अकुशलचे ऑनलाईन हजेरी पत्रक अनेक महिन्यांपासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुखेड पंचायत समितीअंतर्गत सिंचन विहीर योजनेपासून अनेक पात्र लाभार्थी शेतकरी वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन म.ग्रा.रोहयो अंतर्गत सिंचन विहीरीच्या कामाच्या हजेरी पत्रकाबाबत व नवीन सिंचन विहीर मंजूरीबाबत तसेच यास जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (३०-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भाटशिरगाव (जि.सांगली, ता.शिराळा) येथील रोपवाटिकेला निधी व कर्मचारी उपलब्ध करुन कामकाज सुरु करण्याबाबत

**(४०) ११६२९ (०८-०९-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाटशिरगाव (जि.सांगली, ता.शिराळा) येथील शेतकऱ्यांना शेतीपूरक मार्गदर्शन व लाभ मिळण्यासाठी सन १९६८ मध्ये रोपवाटीकेची स्थापना झाली व या रोपवाटीकेमध्ये बियाणे निर्मिती, फळझाडांची रोपे यांची निर्मिती

केली जात होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक वर्षांपासून रोपवाटीकेचे काम निधी अभावी तसेच अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे बंद असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रोजंदारीवर काम करणाऱ्या महिला व पुरुष मजुरांचे रोजगार बंद असल्याने उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून बियाणे, रोपे यासाठी खाजगी रोपवाटीकांचा आधार घ्यावा लागल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन भाटशिरगाव (जि.सांगली, ता.शिराळा) या रोपवाटीकेला निधी व कर्मचारी उपलब्ध करून रोपवाटिकेचे कामकाज सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (२२-०६-२०२६) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) निधी उपलब्ध होत असून रोपवाटिकेचे कामकाज सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.निळा (ता.पुर्णा, जि.परभणी) येथील महागाव व कंठेश्वर तसेच मौ. खळी (ता.गंगाखेड) खोकलेवाडी व माखणीया या पुनर्वसीत गावात नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४१) ११९०० (१९-०८-२०२५). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे निळा (ता.पुर्णा, जि.परभणी) येथील महागाव व कंठेश्वर तसेच मौजे खळी (ता.गंगाखेड) खोकलेवाडी व माखणीया या पुनर्वसीत गावात नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, परभणी यांनी शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मंजूरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मदत व पुनर्वसन मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजी लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (१९-०६-२०२६) :** (१) मौजे निळा, महागाव व कंठेश्वर (ता. पुर्णा जि. परभणी) तसेच मौजे खळी, खोकलेवाडी व माखणी (ता. गंगाखेड जि. परभणी) या पुनर्वसित गावांत नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २६ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे सादर केलेला आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून दिनांक २६ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने त्रुटींची पूर्तता व आवश्यक माहिती/अहवाल सादर करण्याबाबत विभागीय आयुक्त,

छत्रपती संभाजीनगर यांना शासन पत्र दिनांक ५ ऑक्टोबर, २०२३ अन्वये कळविण्यात आले होते. तथापि त्यानुसार माहिती/ अहवाल प्राप्त न झाल्याने विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व जिल्हाधिकारी परभणी यांना दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ व दिनांक ९ जून, २०२५ रोजीच्या स्मरणपत्रा अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार अप्पर जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून दिनांक १०जून, २०२६ रोजीच्या पत्रान्वये अहवाल प्राप्त झाला असून त्यावर तपासून कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## येडशी (ता.जि.धाराशिव) येथील रामलिंग घाट अभयारण्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहालय उभारण्याबाबत

**(४२) १२०६६ (०८-०९-२०२५). श्री.राणाजगजितसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येडशी (ता.जि.धाराशिव) येथील रामलिंग घाट अभयारण्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहालय उभारण्याबाबत मा.वने मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली माहे मे, २०२५ मध्ये बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालाघाट डोंगर रांगेत असलेले येडशी रामलिंग अभयारण्य हे धाराशिव जिल्ह्यातील एक नैसर्गिक आणि ऐतिहासिक वारसा असलेले महत्त्वाचे ठिकाण आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हे अभयारण्य धाराशिव व बीड शहरापासून अनुक्रमे २० व ९५ कि.मी. अंतरावर असून लातूर-बार्शी तसेच सोलापूर-धुळे हा महामार्ग याच अभयारण्यातून जात असून सह्याद्रीच्या बालाघाट पर्वतरांगामध्ये वसलेले हे अभयारण्य सन १९९७ मध्ये शासनाने २२३७.५ हेक्टर क्षेत्राला संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धाराशिव जिल्ह्यातील एकमेव वन पर्यटनाचे केंद्रबिंदू हा परिसर होऊ शकतो या उद्देशाने पर्यटन वाढ, स्थानिक रोजगार निर्मिती, पर्यावरण संवर्धन या माध्यमातून हे ठिकाणी विकसित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांकडून वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रामलिंग घाट अभयारण्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्राणीसंग्रहालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :**(१), (२), (३), व (४) हे खरे आहे.

येडशी (ता.जि.धाराशिव) रामलिंग घाट अभयारण्याबाबतची अधिसूचना १६ मे, १९९७ रोजी निर्गमित झालेली असून सदर अभयारण्याचे क्षेत्र वन्यजीव विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे अखत्यारीत आहे.
(५) येडशी रामलिंगघाट वन्यजीव अभयारण्य हे संरक्षित क्षेत्र असल्याने वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अन्वये अभयारण्य क्षेत्रामध्ये सफारी पार्क, अथवा प्राणिसंग्रहालय तयार करावयाचे असल्यास त्यास राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची (NBWL) पूर्वपरवानगी तसेच केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण, नवी दिल्ली (CZA) यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. तसेच केंद्रीय पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक०८.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपवादात्मक परिस्थिती वगळता प्राणिसंग्रहालयाची उभारणी ही वन्यजीव क्षेत्रामध्ये करण्यात येऊ नये, त्याऐवजी वन्यप्राण्यांचा अधिवासाला कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेऊन प्राणिसंग्रहालयाची उभारणी त्यालगतच्या क्षेत्रामध्ये करणेबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याअनुषंगाने प्रस्तावित प्राणिसंग्रहालय कामाची उभारणी येडशी रामलिंग घाट वन्यजीव

उभयारण्याऐवजी त्यालगत असलेल्या प्रादेशिक वनक्षेत्रातील जागेत करणेबाबत सुयोग्य जागेची निवड करणेबाबतची कार्यवाही वनसंरक्षक (प्रा.), छत्रपती संभाजीनगर यांचे स्तरावर सुरू आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील जंगल क्षेत्राची स्थिती चिंताजनक असल्याबाबत**

**(४३) १२२०६ (१९-०८-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील जंगल क्षेत्राची स्थिती चिंताजनक असून ४० % जंगल क्षेत्र निकृष्ट असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अभ्यासाचा अहवाल शासनास प्राप्त झाला असल्यास अंमलबजावणी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गणेश नाईक (२३-०६-२०२६) :**(१) व (२) हे खरे नाही.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील वनाच्या आरोग्याच्या संबंधाने कोणताही अधिकृत संशोधन अभ्यास संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली या कार्यालयाकडून करण्यात आलेला नाही. तसेच अभ्यासासाठी कोणीही परवानगी घेतलेली नाही. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील वनाच्या आरोग्याच्या संबंधाने प्रबंध आंतरजालावर उपलब्ध असून त्यामध्ये विविध निर्देशकांचा अभ्यास करुन संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वन क्षेत्राबाबत निष्कर्ष काढले आहेत.

सदरचा अभ्यास उपग्रहाच्या रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस तंत्रज्ञानाच्या माध्यमातून केला असून सदर अभ्यासातून काढलेल्या निष्कर्षानुसार कमी आरोग्यदायी वन ३९.५२%, आरोग्यदायी वने ३६.५१%, अत्यंत आरोग्यदायी वने ३.३६% असल्याचे त्यांचे संशोधन अहवालात निष्कर्ष काढले आहेत. सदरचे निष्कर्ष हे अभ्यासकाने त्यांचे अभ्यासाचा विषय म्हणून व त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे काढले असल्याने सदर निष्कर्षाबाबत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडून प्रमाणित केलेले नाही.

सदर अहवालाबाबत वन विभागाकडे कोणताही दस्तऐवज कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध नाहीत. भारतीय वन सर्वेक्षण संस्था, देहरादून यांचेकडील Indian State of Forest Report (ISFR) २०२३ मध्ये मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये ८१.२० चौ.कि.मी. वनक्षेत्र हे मध्यम घनतेचे (Moderately Dense) असून सन २०२१ च्या तुलनेत ०१.४२ चौ.कि.मी. वनक्षेत्रामध्ये वाढ झालेली दिसून येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहिल्यानगर जिल्ह्यातील 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत' लाभार्थ्यांना मिळणारा लाभ प्रलंबित असल्याबाबत**

**(४४) १२२८२ (२१-०७-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यानगर जिल्ह्यातील 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा' योजनेंतर्गत दिनांक ३१ मार्च, २०२५ रोजीपर्यंत ३ कोटी ५० लाख इतका निधी शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत अर्ज केलेल्या अनेक कुटुंबांना त्यांच्या कुटुंबप्रमुखाच्या आकस्मिक निधनानंतर विविध समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्ह्यातील गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (१७-०४-२०२६) :** (१) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना देय असलेला लाभ देण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले अनुदान शासनाकडून वेळोवेळी कृषि आयुक्तालयास उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
(२) व (३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान या योजनेंतर्गत अहिल्यानगर जिल्हयातील एकूण १८० (१७० मृत्यू + १० अपंगत्व) पात्र प्रस्ताव निकाली काढण्यासाठी रु.३.५० कोटी इतका निधी कृषि आयुक्तालयामार्फत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.

तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर, २०२५ अखेर अहिल्यानगर जिल्हयातील एकूण २९४ पात्र प्रस्ताव निकाली काढण्यासाठी रक्कम रु.३.५७ कोटी इतका निधी कृषि आयुक्तालयामार्फत लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा जिल्ह्यातील सेलसुरा कृषी विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांसाठी नवे प्रयोग, संशोधन प्रकल्प वा विस्तार योजना अंमलात आणण्याबाबत

**(४५) १२३३३ (२१-०७-२०२५). श्री.राजेश बकाने (देवळी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्ह्यातील कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा येथे शेतकऱ्यांकरीता कृषी सेवा व सल्लागार सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या केंद्रामार्फत शेतकऱ्यांना प्रशिक्षण, मार्गदर्शन व तांत्रिक सहाय्य सन २०२० पासून ते आजतागायत प्रदान करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या केंद्रात शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी तांत्रिक यंत्रणा वा प्रयोगशाळा कार्यरत आहे तसेच कृषी सेवा व सल्लागार सुविधा उपलब्ध आहेत काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विज्ञान केंद्रामार्फत शेतकऱ्यांसाठी नवे प्रयोग, संशोधन प्रकल्प वा विस्तार योजना अंमलात आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (२४-०६-२०२६) :** (१) होय,
(२) या केंद्रामार्फत शेतकऱ्यांकरिता सन २०२०-२१ या वर्षापासून एकूण ५५९ प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. याखेरीज, एकूण ४५ चाचणी प्रयोग, ५१ प्रथम रेषीय प्रात्यक्षिके, ७ समूह प्रथम रेषीय प्रात्यक्षिके, २४२ निदान प्रक्षेत्र भेटी आणि ६२९२ माती परीक्षणे घेण्यात आली आहेत,
(३) होय,

या कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने तांत्रिक यंत्रणा व प्रयोगशाळा कार्यरत आहेत. या केंद्राकडून शेतकऱ्यांना विविध कृषि विषयांबाबत तांत्रिक सल्ला, मार्गदर्शन व

प्रशिक्षण देण्यात येते.

या केंद्रामार्फत शेतकऱ्यांच्या शेतावरील चाचणी प्रयोग, प्रात्यक्षिक प्रकल्प, प्रशिक्षण कार्यक्रम, कृषि मेळावे, कृषि प्रदर्शनी, कृषि सप्ताह, मासिक सभा, प्रक्षेत्र भेटी, पीक सल्ला इत्यादीचे आयोजन केले जाते.

अशाप्रकारे, या केंद्राच्या माध्यमातून कृषि विषयक सेवा व सल्लागार सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत,

(४) वर्धा, सेलसुरा येथील कृषि विज्ञान केंद्र हे भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत १०० टक्के अनुदान तत्त्वावर चालविण्यात येत आहे. या ठिकाणी शेती प्रयोग संशोधन, विस्तार योजना राबविण्याच्या आवश्यकतेबाबत तपासणी करण्याच्या सूचना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे, महाराष्ट्र राज्य यांना देण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शेतांमध्ये रासायनिक खतांचा तसेच पाण्याचा अतिरिक्त वापर होत असल्यामुळे जमिनी क्षारपड होत असल्याबाबत

**(४६) १३०७१ (०८-०९-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतांमध्ये रासायनिक खतांचा तसेच पाण्याचा अतिरिक्त वापर होत असल्यामुळे जमिनी क्षारपड होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे जमिनीचा कस कमी होत असून प्रति हेक्टरी मिळणाऱ्या शेती उत्पादनात घट होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (२५-०६-२०२६) :** (१) राज्यातील क्षारपड जमिनीचे सर्वेक्षण कृषी विभागामार्फत करण्यात येत नाही. रासायनिक खतांचा अतिरिक्त वापर होत असल्याने जमीन क्षापरड होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

जलसंपदा विभागामार्फत राज्यातील मोठ्या मध्यम प्रकल्पांच्या एकूण ८७ कालव्यांच्या लाभक्षेत्रात घेण्यात आलेल्या निरीक्षणाच्या आधारे एकूण २१,१२३ हेक्टर खराबा क्षेत्र आढळून आले. तथापि त्यामागची कारणे रासायनिक खतांचा अतिवापर किंवा पाण्याचा अतिरिक्त वापर ही नसून कालव्यातील पाझर/ गळती, नैसर्गिक नाल्यावर अतिक्रमणे, साचलेल्या गाळामुळे पाण्याचा निचरा न होणे , या बाबी जमीन क्षारपड होण्यास कारणीभूत आहेत.

(२) व (३) राष्ट्रीय कृषि विकास योजना (DPR) घटकाअंतर्गत सच्छिद्र निचरा प्रणालीद्वारे क्षारपड जमीन सुधारणा हा सुधारीत प्रकल्प मृद व जलसंधारण विभागामार्फत कोल्हापूर जिल्हातील शिरोळ तालुक्यातील ७ गावांमध्ये राबविण्यात आला आहे.

याशिवाय जलसंपदा विभागांतर्गत खाजगी आणि सहकारी उपसा सिंचन योजनांच्या लाभक्षेत्रातील खराबा जमिनीची सुधारणा करण्याकरीता भूमिगत चर योजना राबविण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत शेतकऱ्यांना फळपीके व फुलपीके यांची रोपे खाजगी रोपवाटिकांमधून खरेदी करण्यास परवानगी देण्याबाबत**

**(४७) १३०८७ (०८-०९-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाची एक महत्त्वपूर्ण योजना असून शेतकऱ्यांना फळपीके व फुलपीके यांची लागवड व अन्य कामे करण्यास सूट असून त्यासाठी लागवड करण्याकरीता शेतकऱ्यांनी रोपे शासकीय रोपवाटिकेमधूनच घ्यावीत, असा कृषी विभागाचा नियम आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सर्व प्रकारची फळपीके व फुलपीके यांची रोपे शासकीय रोपवाटिकेमध्ये उपलब्ध असल्याची शाश्वती नसून ती रोपे खाजगी रोपवाटिकांमध्ये उपलब्ध असू शकतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना फळपीके व फुलपीके यांची रोपे खाजगी रोपवाटिकांमधून खरेदी करण्यास परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भरत गोगावले (०६-०४-२०२६) :** (१) हे खरे, नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतकऱ्यांना पेरणीसाठी बियाणे तसेच पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४८) १३२४९ (१९-०८-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती, पेरणीसाठी उच्च गुणवत्ता असलेले बियाणे तसेच पिक कर्ज वाटप करण्याबाबत कळमेश्वर तहसील कार्यालय (नागपूर) येथे कृषी विभाग खरीप हंगामपूर्व सभेचे माहे मे, २०२५ मध्ये आयोजन केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सभेत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शेतकऱ्यांना पिक कर्ज, पेरणीसाठी चांगले बियाणे उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शेतकऱ्यांना पेरणीसाठी चांगले बियाणे तसेच पिक कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दत्तात्रय भरणे (२५-०६-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) नागपूर जिल्ह्यामध्ये पेरणीसाठी मुख्य पिकांकरिता मुबलक बियाणे उपलब्ध असून पीकनिहाय सोयाबीन बियाणे २१,८८५ क्विंटल, तूर बियाणे २,५५५ क्विंटल, कापूस बियाणे १०,२१,०५२ पाकिटे, ज्वारी बियाणे ८५ क्विंटल उपलब्ध होते. तसेच कळमेश्वर तालुक्यात एकूण ८६ कृषि सेवा केंद्र व कळमेश्वर तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री समिती मर्यादित, कळमेश्वर यांचे एकूण ७ केंद्र असून कळमेश्वर तालुक्यातील शेतकऱ्यांना पेरणीसाठी कापूस, तूर, सोयाबीन, ज्वारी तसेच इतर उच्च प्रतीचे चांगले बियाणे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

दिनांक १५ जून, २०२५ अखेर कळमेश्वर तालुक्यातील २,११० शेतकऱ्यांना एकूण रु. ३६३१.९५ लाख

पीक कर्ज वाटप करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौ.खडकी, (ता.अर्धांपूर जि.नांदेड) येथील सांगवी ग्रामपंचातीच्या हद्दीतील जमिन घरकुल योजनेसाठी हस्तातरित करण्याबाबत**

**(४९) १३२६५ (२०-०७-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.खडकी, (ता.अर्धांपूर जि.नांदेड) येथील सांगवी ग्रामपंचातीच्या हद्दीतील पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादित जमिनीपैकी अतिरिक्त ठरणारी जमिन घरकुल योजनेसाठी हस्तांतरित करण्यास शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे काय,
(२) असल्यास, सदर जमिन घरकुल योजनेसाठी प्रत्यक्षात हस्तांतरीत झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मकरंद जाधव (पाटील) (२५-०६-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
मौजे खडकी ता. अर्धापुर जि. नांदेड येथील सांगवी ग्रामपंचायतीच्या हद्दीतील पुरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादीत जमीनीपैकी अतिरिक्त ठरणारी जमीन ग्रामीण घरकुल योजनेसाठी हस्तांतरीत करण्यास दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या शासनपत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक २१ ऑगस्ट, २०२५ अन्वये हस्तांतरण आदेश पारीत केले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सेवाज्येष्ठता यादीतील तफावत दुरूस्त करून रिक्त झालेल्या जागांवर तहसीलदारांना पदोन्नती देण्याबाबत**

**(५०) १३६४७ (१९-०८-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नुकत्याच ८० उपजिल्हाधिकाऱ्यांना अपर जिल्हाधिकारीपदी पदोन्नती दिल्याने रिक्त झालेल्या जागांवर तहसीलदारांची पदोन्नती होणे अपेक्षीत असताना सेवाज्येष्ठता यादीतील तफावतीमुळे ही पदोन्नती प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सेवाज्येष्ठता यादीतील तफावत दूर करून रिक्त झालेल्या जागांवर तहसीलदारांना पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१८-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) तहसिलदार संवर्गाची दिनांक १ जानेवारी, १९९७ ते ३१ डिसेंबर, २०१५ या कालावधीची राज्यस्तरावरील एकत्रित अंतिम ज्येष्ठतासुची महसुल विभाग, शासन परिपत्रक, दिनांक १३ ऑक्टोबर, २०२५ अन्वये प्रसिध्द

करण्यात आली आहे. पदोन्नती प्रक्रियेबाबत मा.न्यायाधिकरणाचे आलेले निर्बंध दूर झाल्यानंतर वरील अंतीम ज्येष्ठता सुचीतील तहसिलदार संवर्गातील १०९ अधिका-यांना सेवाज्येष्ठता व पात्रतेनुसार उप जिल्हाधिकारी पदी दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी पदोन्नती देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.